## कार्यकर्त्यांचा जल्लोष

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मागण्या यशस्वी झाल्याचे समजतात आझाद मैदान परिसरात एकच जल्लोष सुरू झाला. ढोल ताशांच्या गजरात कार्यकर्ते बेभान होऊन नाचू लागले. मागील पाच दिवसांपासून असलेला थकवा आणि क्षीण कुठच्या कुठे पळून गेला. कार्यकर्ते आनंदाने बेभान होऊन नाचत होते. राज्य सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी येताच आझाद मैदान पुन्हा एकदा गर्दीने फुलले. सर्व आंदोलक मैदानात जरांगे पाटील यांना पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी येऊ लागले. 'पाटील पाटील' आणि 'दादा दादा' अशा घोषणा दिल्या जात होत्या. 'एक मराठा लाख मराठा' या घोषणेने मैदान दणाणून गेले. आमच्या गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्याला यश आले. मराठ्यांनी करून दाखवले, अशी प्रतिक्रिया आंदोलकांनी व्यक्त केली. डोक्यावर भगवी टोपी, गळ्यात भगवे उपरणे घातलेल्या आंदोलकांमुळे सारा परिसर भगवा झाला होता.


गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर



**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६



नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | बुधवार, ३ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९२ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


**अग्राग्रलेख**

## खरीखरी

### जरांगे - देवेंद्र, दोन कंठमणी

आम्ही चार-पाच दिवसांपूर्वीच याच स्तंभात एक वाक्य लिहिले होते. तेव्हा आम्ही असे लिहिले होते की, त्यांचाही विजय आणि यांचाही विजय त्याप्रमाणेच आज तेही जिंकले आणि हेही जिंकले. त्यामुळेच आमचे शब्द आज अक्षरशः खरे ठरलेले आहेत. आज सायंकाळी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळालेले आहे कारण गेले पाच दिवस मंत्रिमंडळाने आणि विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या बहुतेक सर्व मागण्या मान्य केलेल्या आहेत. ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या आणि हे आंदोलन चिघळत आहे असे काल सायंकाळपर्यंत वाटत होते, त्या आंदोलनाची सांगता आज अतिशय उत्तम प्रकारे विजयोत्सवामध्ये झाली हे खूप महत्त्वाचे आहे. मराठा समाजाच्या मागण्या आणि त्यासाठी जरांगे पाटील यांनी ज्या पद्धतीने सर्व सूत्रे हलवली आणि मग आपल्या समाज बांधवांना योग्य न्याय मिळवून दिला त्याबद्दल जरांगे पाटलांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच होईल. पण त्याचवेळी सरकार पक्षाने अत्यंत कौशल्याने कायदेशीररीत्या कुठलाही अडथळा येणार नाही असे अध्यादेश काढून मराठा समाज आणि त्यांच्या नेत्याला कुठल्याही प्रकारे अडचण येणार नाही, याचा कडेकोट बंदोबस्त केला. या सर्व गोष्टींच्या मागे मुख्यमंत्र्यांचे अति कौशल्य, गठीत केलेल्या उपसमितीचे मराठा समाजाच्या मागणीसाठी चे सकारात्मक धोरण आणि त्यासोबतच सरकार व आंदोलन यांच्यातील दुवा म्हणून उपसमितीने केलेली यथायोग्य शब्दावली याला आणि त्यांच्या कृतीला महाराष्ट्राची जनता धन्यवादच देईल. आंदोलन कोणतेही असो त्याला किती तापवावे आणि त्याला कुठे थांबवावे यादरम्यान आपल्या अनुयायांना कसे आवरावे याचे संपूर्ण नियोजन आंदोलक आणि त्यांचे नेते जरांगे पाटील यांनी ज्या पद्धतीने केले, त्याला कुठेच तोड नाही. ज्या जरांगे पाटलांना त्यांच्या तालुका आणि जिल्ह्याबाहेर कोणीही ओळखत नव्हते ते मराठा समाजाचे आता कंठमणी झालेले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून भावनापूर्ण लढाई लढून आजचा सोन्याचा दिवस दाखवून मराठा समाजाला न्याय मिळवून त्यांनी दिला आहे त्याबद्दल भविष्यकाळात जरांगे पाटील या देव माणसाची आंदोलनाच्या इतिहासात नोंद केली जाईल. याबरोबरच महाराष्ट्र सरकारने हे प्रकरण ज्या पद्धतीने हाताळले तेही प्रशंसनीय आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुसऱ्या बाजू कडून कंठमणी ठरतात. कारण सरकारने जरांगे पाटील यांना मुंबईबाहेर का थांबवले नाही. खारघर मध्ये असलेल्या मैदानावर त्यांची व्यवस्था का केली नाही? असे प्रश्न अनेकांनी उपस्थित केले. पण खारघर पेक्षा गोडघर म्हणून आझाद मैदानाची नोंद करण्यासाठी सरकारने जरांगे पाटील यांना मुंबईत स्थान दिले असावे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी यांनी सर्व समाजासाठी काम करावयाचे आहे असे त्यांनी आज नागपुरात पत्रकारांशी बोलताना सांगितले. कधी कधी टीकेला धनी व्हावे लागते तर कधीकधीं फुलांचे हार गळ्यात पडतात. हे त्यांचे प्रतिपादन खूप बोलके आहे. सर्वांना जे मागेल ते देणारी मुंबापुरी या आंदोलनाच्या निमित्ताने सर्वांनाच पावली, सर्वांनाच भावली याबद्दल जरांगे पाटील यांचे आणि महाराष्ट्र सरकारचेही मनापासून अभिनंदन!


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# गुलाल उधळला!

## जरांगेंच्या मागण्या मान्य



**गजानन तुपे**

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून सुरू केलेले बेमुदत उपोषण आज मागे घेतले. तत्पूर्वी, मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेतली. त्यांना उपसमितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. या निर्णयांबाबत जीआर काढावा अशी मागणी जरांगे यांनी केली. सरकारनेही या मागणीची पुर्तता केल्याने जरांगे यांनी सरकारचा जीआर स्विकारत आपले उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले. तसेच आज रात्री ९ वाजेपर्यंत मराठा आंदोलक मुंबई सोडतील अशी घोषणाही त्यांनी केली.

सरकारकडून आलेल्या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांना भेटीदरम्यान महत्त्वपूर्ण प्रस्ताव दिला, जो जरांगेंनी जाहीरपणे वाचून दाखवला. या शिष्टमंडळात मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि माणिकराव कोकाटे यांचा समावेश होता. सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या प्रस्तावाला उपसमितीची मान्यता मिळाल्याचे जाहीर केले आहे.

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याविषयी स्पष्टीकरण दिले. त्यांनी सांगितले की, "सरकारने सप्टेंबर महिन्यापर्यंत मराठा आंदोलकांवर दाखल झालेले सर्व गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन दिले आहे." तसेच, ज्यांनी आरक्षणासाठी आपले बलिदान दिले आहे, त्यांच्या वारसांना येत्या ८ दिवसांत आर्थिक मदत देण्यास सरकार तयार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**सरकारची पावले आणि पुढील दिशा**

या भेटीनंतर मंत्री विखे पाटील यांनी, हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीची सूचना दिली असल्याची माहिती दिली. त्याचबरोबर, सातारा गॅझेटियर लागू करण्याच्या कायदेशीर बाबी तपासल्या जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा योग्य दिशेने मार्गक्रमण करत असल्याचे दिसत आहे. जरांगे पाटील यांनी जातीच्या प्रमाणपत्रांचा निर्णय तातडीने घेण्याची सूचनाही सरकारला केली आहे. यावेळी जरांगे म्हणाले, सातारा गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मागणीही आपण केली होती, जी पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांना लागू होते. औंध आणि सातारा गॅझेटमध्ये काही कायदेशीर त्रुटी आहेत. सरकारने या त्रुटींचा अभ्यास करून पुढील १५ दिवसांत अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले आहे. यावर जरांगे पाटील यांनी शिवेंद्रराजे यांच्याकडून एक महिन्याची मुदत देत अंमलबजावणीची हमी घेतली आहे

**मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाला मोठं यश मिळाले असून मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचे सांगितले. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करून कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचे उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केले. तसेच सातारा गॅझेटच्या मागणीवर जलदगतीने निर्णय घेणार असल्याचंही उपसमितीने मान्य केले. याबाबतचा जीआर मनोज जरांगे यांनी पाहताच,जिंकलो रे! अशी घोषणा करताच आरक्षणासाठी मुंबईत आलेल्या सर्व मराठा बांधवांमध्ये आनंदाची लहर उमटली आणि तिथल्या तिथे गुलाल उधळत आझाद मैदानातील आंदोलकांनी आपला आनंद साजरा केला.**

- हैदराबाद गॅझेटियरची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्याला शासनाने मान्यता दिली आहे.
- गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
- सातारा गॅझेटवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्याला मान्यता देण्यात येणार आहे.
- मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार.
- मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी १५ कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.
- शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देणार.

### पाटील...पाटील...पाटील...

### जयघोषाने आझाद मैदान दुमदुमले

राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यात अनेक विषयांवर एकमत झाल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली. त्यानंतर हे आंदोलन विजयी झाल्याची घोषणाही जरांगे पाटील यांनी केली. त्यानंतर आंदोलन समाप्त झाल्याची अधिकृत घोषणा जरांगे पाटील करणार आहेत. घरी जाताना आंदोलकांना त्रास देऊ नका, अशा सूचना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पोलिसांना दिल्या आहेत.




### खोटा शब्द देणार नाही - बाबाराजे

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढाईत आझाद मैदानावर मोठी घडामोड घडली. सरकारने जरांगे यांच्या पाच प्रमुख मागण्यांपैकी गॅझेटियरसंबंधीच्या तीन मागण्या मान्य करण्याचे पत्र दिल्यानंतर, तासाभराच्या चर्चेनंतर जरांगेंनी सरकारचा प्रस्ताव स्वीकारला. परंतु या चर्चेत एक ठराविक क्षणी झालेला संवाद आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

शिवेंद्रराजे भोसले यांनी सातारा गॅझेटियरची पूर्ण जबाबदारी स्वतःवर घेत, "खोटा शब्द देणार नाही. खोटं असतं तर आलोच नसतो" असा ठाम शब्द जरांगेंसमोर दिला.

यावर जरांगेंनी थेट प्रत्युत्तर दिलं "राजेंचा शब्द आमच्यासाठी अंतिम असतो. बाकी कोणालाही आम्ही मोजत नाही."

सरकारच्या शिष्टमंडळातील राधाकृष्ण विखेंनी स्पष्टीकरण देताच, जरांगेंनी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देश यांचा उल्लेख करत सातारा गॅझेटियरमधील नोंदींची जबाबदारी राजेंवर सोपवली. त्यावर शिवेंद्रराजेंनी निःसंकोचपणे जबाबदारी मान्य करत "हे काम पंधरा दिवसात किंवा जास्तीत जास्त महिन्यात पूर्ण होईल" असा विश्वास दिला.

या संवादानंतर आझाद मैदानावर जल्लोषाचा क्षण अनुभवायला मिळाला. आता मराठा समाजाच्या अपेक्षा शिवेंद्रराजेंच्या या शब्दांवर केंद्रित झाल्या आहेत.

### " ... तर विखे पाटील साहेब मी तुमच्या घरातून जीव देईपर्यंत उठणार नाही "

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी पाच दिवसांनंतर उपोषण सोडले आहे. मराठा आंदोलकांच्या समोरच जरांगे यांनी विखे पाटील यांना आता हैद्राबादच्या गॅझेटीयरची अंमलबजावणी झाली का? असा थेट प्रश्न विचारला. त्याच्या अंमलबजावणीसाठीच तर जीआर काढला आहे असे उत्तर विखे पाटील यांनी दिले. यापुढे गॅझेटीयरमधील नोंदीनुसार आम्हाला आता कुणबी प्रमाणपत्र दिले जाणार का? यावर विखे यांनी सांगितले की, जे आपण निकष दिले आहेत, ती पूर्तता केली की.. नातेवाईक असेल, कोणी पंजोबा-खापर पंजोबा असेल किंवा कुटुंबातील कोणी असेल आणि प्रतिज्ञापत्र दिलं तरी त्याला दाखला दिला जाईल असे विखे पाटील म्हणाले.

मला उद्या-परवा अभ्यासक येऊन जर म्हणाले की इथे फसवणूक झाली, तर मला विखे-पाटील यांच्याकडून एक शब्द पाहिजे की त्याचा सुधारित एक जीआर काढावा. यावर विखे पाटील म्हणाले की, "मी जरांगेंना एवढंच सांगू इच्छितो की, जीआरच्या माध्यमातून अतिशय विचारपूर्वक सर्व प्रक्रिया आपण पूर्ण केल्या आहेत. तरी त्यामध्ये एखादी शंका उपस्थित झाली तर निश्चितपणे माझ्याकडे पाठवा. आपण त्यात शुद्धीकरण करू," असे आश्वासन विखे पाटील यांनी यावेळी दिले. जर कदाचित चार-आठ दिवसांनी कोणी म्हणालं की यात चूक आहे, तर विखे पाटील साहेब मी तुमच्या घरातून जीव देईपर्यंत उठणार नाही. मराठा समाजाचं वाट्टोळं नको. माझं नशीब चांगलं आहे की, अशा मंत्र्यांनी जीआर काढला आहे की ते माझ्या टप्प्यातच आहेत. जरी फसवणूक झाली तर सांगतो, आपण हळूहळू ३ कोटी मराठे आरक्षणात घातले आहेत. आता पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा पूर्ण आरक्षणात घातला आहे. माझा तुम्हाला शब्द आहे की जीवात जीव असेपर्यंत लढेन असेही मनोज जरांगे म्हणाले.

### फडणवीससाहेब कटुता संपवूया... - जरांगे पाटील

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारचे, मंत्रिमंडळाचे आभार मानले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपोषण सोडायला यावं, तुमचं आमचं वैर संपलं असे म्हणत जरांगे पाटील यांनी उपोषण सोडण्यासाठी सरकारपुढे अट ठेवली. तुम्ही या, नका येऊ आमची ही विनंती आहे, असे जरांगे पाटील यांनी म्हटले. त्यावर, आपण हे उपोषण आज सोडूया, उपोषण मागे घ्यावे, नंतर आपण मुख्यमंत्र्यांसमवेत भेटूया असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खूप मदत केली, त्यांच्यामुळेच आम्ही इथपर्यंत आलोय, ह्या मागण्या मान्य करू शकलो असे विखे पाटील यांनी म्हटले. त्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांनी काही वेळातच आपले उपोषण सोडले.

आमचं म्हणणं एवढचं आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित दादा आणि आमच्या मराठ्यांमध्ये एक कटुता आहे, ते जर इथं आले तर ती कटुता संपुष्टात येईल पण ते आले नाहीत तर ही कटुता कायम राहिल, असे म्हणत जरांगे पाटील यांनी उपोषण सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना बोलावले होते. मात्र, विखे पाटलांच्या विनंतीनंतर अखेर जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं आहे. मंत्रिमंडळ समितीचा प्रमुख मलाच सर्व अधिकार देण्यात आले आहेत, त्यामुळे माझ्यासह मंत्रिमंडळातील सदस्यही आमच्यासोबत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व अधिकार राधाकृष्ण विखे पाटील यांनाच दिले आहेत, त्यामुळे आपण उपोषण सोडावं अशी विनंती असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले. त्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना विचारत राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते पाणी पिऊन उपोषण सोडले. तसेच, दमानं गाड्या चालवा म्हणत मुंबईतून आता गावाकडं जायचंय, घरी निघायचं असे आवाहनही केले.





### कर्तव्यात कधी शिव्या, तर कधी फुलांचे हार मिळतात - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मराठा समाजाचे मुंबईतील आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. सरकारच्या या शिष्टाईचे श्रेय त्यांनी मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीला दिले आहेत. मी प्रत्येक समाजासाठी काम करत राहील, असेही फडणवीस यांनी सांगितले आहे.

मला दोष दिले, शिव्या दिल्या तरीही मी समाजासाठी कालही काम करत होतो आणि उद्याही करत राहीन. मराठा, ओबीसी किंवा महाराष्ट्रातील कोणताही समाज असो, प्रत्येकासाठी काम करणं माझं कर्तव्य मानतो. त्या कर्तव्यात कधी शिव्या, तर कधी फुलांचे हार मिळतात असं ते म्हणाले आहेत.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले याचा मला आनंद आहे. मंत्रिमंडळ उपसमितीने आज मराठा समाजाच्या हितासाठी चांगला तोडगा काढला याचाही मला आनंद आहे. जरांगे यांचे उपोषण आता संपलेले आहे. खरं म्हणजे हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी आमची सुरुवातीपासूनच तयारी होती. पण मनोज जरांगे यांची सरसकट कुणबी प्रमाणत्र द्यावे या मागणीला कायदेशीर अडचणी होत्या. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता सरसकट मराठा समाजाला आरक्षण देणे शक्य नव्हते.

हीच वस्तूस्थिती जरांगे यांच्या टीमच्या लक्षात आणून देण्यात आले. आपल्या कायद्याप्रमाणे, देशाच्या संविधानाप्रमाणे आरक्षण हे समूहाला नव्हे तर व्यक्तीला मिळत असते. संबंधित व्यक्तीने ते आरक्षण मागायचं असायचं. म्हणूनच सरसकट आरक्षण कायद्याच्या पताळीवर टिकणार नाही, हे जरांगे यांच्या टीमला सांगण्यात आले. जरांगे यांनीदेखील ही भूमिका समजून घेतली. कायद्यात सरसकट आरक्षण बसत नसेल तर ते करू नका असे जरांगे यांनी सांगितले. त्यानंतर मंत्रिमंडळ उपसमितीने चर्चा केली आणि जीआर तयार झाला, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## 'माझ्या आईला शिवीगाळ केली'


### आरजेडी-काँग्रेसच्या यात्रेत घडलेल्या प्रसंगावर मोदींनी व्यक्त केली नाराजी

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये काढलेल्या वोट अधिकार यात्रेत शेवटच्या वाद निर्माण झाला. एका व्यक्तीने यात्रेच्या मंचावर येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या आईबद्दल अपशब्द काढले होते. या व्यक्तीला लगेचच अटकही करण्यात आली. आता खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रसंगावर भाष्य केले असून आपल्या आईबद्दल अपशब्द काढल्याबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

बिहारमधील एका जाहीर कार्यक्रमात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "आई आपले जग आहे. आई आपला स्वाभिमान आहे. आईचा स्वाभिमान आणि अस्मिता बाळगण्याची बिहारची संस्कृती आहे. पण या बिहारमध्ये काही दिवसांपूर्वी काय घडले. आरजेडी-काँग्रेसच्या व्यासपीठावरून माझ्या आईला शिवीगाळ करण्यात आली."

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "ही



शिवीगाळ फक्त माझ्या आईचा अपमान करणारी नाही. तर देशातील माता, भगिनी आणि सर्वच महिलांचा अपमान करणारी आहे. मला माहिती आहे. या प्रसंगाबद्दल ऐकून बिहारच्या प्रत्येक आईला वाईट वाटले असेल. माझ्या हृदयात जितके दुःख आहे, तितकेच बिहारच्या लोकांनाही दुःख झाले आहे, याचीही मला कल्पना आहे."

राजकारणाशी संबंध नसलेल्या माझ्या आईला राजकारणात का ओढले जात आहे? असाही प्रश्न नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केला. आरजेडी आणि काँग्रेसने माझ्या आईचा राजकारणासाठी गैरवापर का केला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. महिला उद्योजकता आणि स्वावलंबन यावर बिहारमध्ये एका नवीन सहकारी उपक्रमाचा शुभारंभ करताना पंतप्रधानांनी हे भावना व्यक्त केली.

दरम्यान काँग्रेसचे नेते पवन खेरा यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात केलेले अवमानकारक विधान भाजपाच्या एजंटनी केलेले आहे. जे दरभंगाच्या रॅलीत घुसले होते. "अवमानकारक विधान भाजपाच्याच लोकांनी आमच्या रॅलीत घुसखोरी करून केले होते. आमच्या यात्रेच्या मुद्द्यावरून लक्ष दूर करण्यासाठीच या विषयाचे राजकारण करण्यात येत आहे. त्यांच्या घुसखोरांना आम्ही पकडले असून यातून त्यांची अगतिकता लक्षात येते", असेही खेरा म्हणाले.

## भारतासाठी ऐतिहासिक क्षण!

## मोदींना 'मेड-इन-इंडिया' विक्रम 32-बिट चिप भेट

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

देशाच्या तंत्रज्ञान क्षेत्रात एक ऐतिहासिक क्षण आला आहे. देशात तयार झालेली पहिली सेमीकंडक्टर चिप 'विक्रम' 32-बिट प्रोसेसर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट म्हणून देण्यात आली. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीमध्ये 'सेमिकॉन इंडिया २०२५' च्या उद्घाटनप्रसंगी ही महत्त्वपूर्ण चिप पंतप्रधानांना सुपूर्द केली.

यावेळी बोलताना रेल्वे, माहिती आणि प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री वैष्णव म्हणाले, "काही वर्षांपूर्वी पंतप्रधानांच्या दूरदृष्टीमुळे 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन' सुरू झाले. केवळ साडेतीन वर्षांत जग भारताकडे विश्वासाने पाहत आहे. सध्या भारतात पाच सेमीकंडक्टर युनिट्सचे काम वेगाने सुरू आहे आणि आज आम्ही पहिली 'मेड-इन-इंडिया' चिप पंतप्रधान मोदींना दिली आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत स्थिरता आणि विकासाचे प्रतीक बनला आहे."



भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (ISRO) सेमीकंडक्टर लॅबने विकसित केलेला विक्रम 32-बिट प्रोसेसर हा भारताचा पहिला पूर्णपणे स्वदेशी मायक्रोप्रोसेसर आहे. प्रक्षेपण यानांसारख्या अत्यंत कठीण परिस्थितीतही तो योग्यरित्या काम करू शकतो.

सेमीकंडक्टर हे आधुनिक तंत्रज्ञानाचे केंद्र आहेत. आरोग्य, वाहतूक, दळणवळण, संरक्षण आणि अंतराळ यांसारख्या क्षेत्रांसाठी ते महत्त्वाचे आहेत. डिजिटलीकरण वाढत असताना, सेमीकंडक्टर देशाच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि धोरणात्मक स्वातंत्र्यासाठी अत्यंत महत्त्वाचे बनले आहेत. २०२१ मध्ये 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन (ISM)' सुरू झाल्यानंतर चार वर्षांतच भारताने या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. या मिशनला पाठिंबा देण्यासाठी सरकारने 76 हजार कोटी रुपयांची प्रोडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह (PLI) योजना जाहीर केली होती. त्यापैकी सुमारे 65 हजार कोटी रुपये आधीच मंजूर झाले आहेत.

## महत्त्वाचे

### आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ३५ प्रस्ताव; पडताळणी सुरू

**नाशिक ।** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी यावर्षी जिल्हाभरातून एकूण ३५ प्रस्ताव प्राप्त झाले असून यापैकी पंधरा शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे. पंधरा शिक्षकांना ५ सप्टेंबर शिक्षक दिनी आदर्श पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातून प्रस्ताव मागविले जातात. त्यानंतर समितीमार्फत पडताळणी केली जाते. यावर्षी संपूर्ण जिल्हाभरातून ३५ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यात त्र्यंबकेश्वर, चांदवड, कळवण, सिन्नर आणि नाशिक या तालुक्यांमधून प्रत्येकी तीन प्रस्तावांचा समावेश आहे. तर निफाड, इगतपुरी, दिंडोरी, पेठ, देवळा, सुरगाणा, नांदगाव, येवला, बागलाण या तालुक्यांमधून प्रत्येकी दोन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. प्राप्त प्रस्तावांमधून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.सध्या यादी अंतिम करण्याची तयारी सुरू असून त्यानंतर यादी मान्यतेसाठी विभागीय महसूल आयुक्तांकडे पाठविली जाणार आहे.

### राजेंद्र सोमवंशी यांचा 'गुणवंत क्रीडा शिक्षक' पुरस्काराने गौरव

**नाशिक ।** नाशिक जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ यांच्या वतीने २९ ऑगस्ट



राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचा "गुणवंत क्रीडा शिक्षक" पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये यशोदामाता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज नाशिकचे क्रीडा शिक्षक राजेंद्र सोमवंशी यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी शिक्षक आमदार किशोर दराडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संजय चव्हाण, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विष्णू निकम, अशोक दुधारे, नरेंद्र छाजेड, संजय होळकर, साहेबराव पाटील, आनंद खरे, राजू शिंदे क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, भाऊसाहेब जाधव व जिल्हास्तरीय नाशिक जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक, खेळाडू व पालक उपस्थित होते.

### विंचूर येथे ईद उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी रूट मार्च

**विंचूर ।** गणेशोत्सव व बकरी ईद या दोन्ही सणांच्या पार्श्वभूमीवर विंचूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांमध्ये



सुरक्षिततेची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने पोलिसांच्या वतीने सोमवारी भव्य रूट मार्च काढण्यात आला. हा रूट मार्च लासलगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, उपनिरीक्षक मोहन पाटील व उपनिरीक्षक किरण साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शहरातील पोलीस चौकीपासून सुरुवात झालेला हा मार्च मेन रोड, कॉलेज रोड, ग्रामपालिका रोड, नेहरू चौक, बजरंग मंडळ, सिद्धार्थ नगर, बाजार गल्ली, मारवाडी पेठ अशा प्रमुख भागातून शिस्तबद्ध रीतीने काढण्यात आला. नागरिकांनी उत्सव काळात शांतता, भाईचारा आणि एकोपा जपावा, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांनी केले आहे.

# सिन्नर सार्वजनिक वाचनालयाच्या निवडणुकीत इतिहास घडेल?

**सिन्नर ।** येथील सार्वजनिक वाचनालय म्हणजे राजकारणाचे जोडे बाजूला काढून कारभार करणारे संचालक मंडळ असा जणू नियमच झाला होता. स्वर्गीय वसंतराव देशपांडे यांनी लावलेले हे रोपटे आता चांगलेच फोफावले असून आपल्याला तेथील संचालक मंडळात कामाची संधी मिळाली पाहिजे, अशा प्रकारची मनीषा बाळगून अनेक नवीन मंडळी संचालक मंडळात प्रवेश करू इच्छितात. त्याचाच परिणाम म्हणून बिनविरोध होणारी निवडणूक यंदा काहींच्या अट्टाहासामुळे रंगणार आहे.

माजी नगराध्यक्ष व वाचनालयाचे कार्यवाह हेमंतनाना वाजे व ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली वाचनालयातील सत्ताधारी पॅनलला प्रतिस्पर्धी म्हणून शिवादादा देशमुख व नामदेवराव कोतवाल यांच्या नेतृत्वाखालील पॅनलमध्ये ही लढत आहे. वाजे-देशपांडे






यांच्या नेतृत्वाखाली प्रगती पॅनलला 'विमान' ही निशाणी मिळाली आहे. त्यांच्या पॅनलमध्ये मनोज भंडारी, उज्ज्वल पंडीत, माधवी पंडित अशा काही नवीन व चांगली प्रतिमा असलेल्या लोकांना संधी दिली. तर देशमुख-कोतवाल यांच्या परिवर्तन पॅनलला 'जीपगाडी' ही निशाणी मिळाली आहे. त्यांनी स्वत:सह प्रा. राजाराम मुंगसे, गोपाळ बर्के, अजय शिंदे, राजेंद्र अंकार, डॉ. श्यामसुंदर झळके, कल्पना परदेशी अशा अभ्यासू व्यक्तींना उमेदवारी दिली आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी मोठी चुरस असुन धक्कादायक निकाल येण्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहे. विशेष म्हणजे दोन्ही पॅनल मध्ये मंत्री माणिकराव कोकाटे व खासदार राजाभाऊ वाजे यांना मानणारे अनेक उमेदवार आहेत ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी दोघांचीही इच्छा होती परंतु आता एका चांगल्या संस्थेला पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ आली त्यामुळे कदाचित या निवडणुकीत इतिहास घडेल, असे बोलले जात आहे.

**हेमंत वाजेंना विरोध करायचे कारणच काय?**

हेमंत वाजे म्हणजे अजातशत्रू व्यक्तिमत्व. कोणत्याही पदाची आयुष्यात कधीही लालसा न धरणाऱ्या हेमंतनानांना या पंचवार्षिक निवडणुकीत डावलण्याचा विचार काहींनी केला होता. परंतु संपूर्ण परिस्थिती वाजेंनी अत्यंत संयमाने हाताळली. विरोधकांमधून देखील त्यांना कोणत्याही प्रकारचा विरोध नव्हता. परंतु निवडणूक बिनविरोध करायची असे ठरल्यामुळे अनेकांनी माघार घेतली. परंतु विरोधी पॅनल मधील एकालाही विद्यमान पॅनलमध्ये न घेण्याचा निर्णय विद्यमान कार्यकारिणीला अडचणीचा ठरला. ज्या वाजेंना डावलण्याचा निर्णय घेतला होता तेच नामदेव कोतवाल यांच्या खेळीने बिनविरोध निवडून आले. 'वाजे नको' अशी भूमिका घेणा-यांना तो मोठा धक्का ठरला. वास्तविक पाहता साहित्य चळवळीशी संबंधित लोकांनी या वाचनालयात खरोखर काम केले पाहिजे. पत्रकारितेच्या पेशात काम केलेले राजेंद्र देशपांडे, राजेंद्र अंकार यांच्यासारखी माणसं वाचनालयात पाहीजेच. परंतु ज्यांनी आयुष्यात कधीही हातात पुस्तक घेतले नाही, अशांनाच वाचनालयामध्ये पदाधिकारी करण्याचा हट्ट कशासाठी व तो हट्ट कोणाचा ? हा सभासदांनाही प्रश्न पडला होता. प्रा. राजाराम मुंगसे, नामदेव कोतवाल अशा साहित्याशी संबंधित लोकांना डावलणे सभासदांनाही आवडले नाही. त्यामुळेच पेशाने वकील असलेले व सर्वच राजकीय पक्षांमध्ये व समाजामध्ये उठबस असलेले शिवादादा देशमुख यांनी विरोधकांचे नेतृत्व स्वीकारले अन् बाजी मारण्यासाठी पुढे पाऊल टाकले.

## महिरावणी येथील जि.प. शाळेला भेट स्वरूपात 'समकालीन' पुस्तके!

### विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीला चालना देणारा स्तुत्य उपक्रम

**नाशिक ।** महिरावणी (ता. नाशिक ) येथील जिल्हा परिषद शाळेला पुणे येथील समकालीन प्रकाशनच्या माध्यमातून ४० पुस्तकांचा दर्जेदार संच भेट देण्यात आला. हा उपक्रम दिव्यांग कर्मचारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष व मातोश्री गी.दे. पाटील माध्यमिक विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब दादा सोनवणेसर यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या हातात दर्जेदार व उपयुक्त साहित्य पोहोचावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. बाळासाहेब सोनवणेसर यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना



वाचनासाठी प्रेरणा मिळणार असून, पुणे येथील 'समकालीन प्रकाशन' यांचे या उपक्रमात अमूल्य सहकार्य लाभले. आजच्या कार्यक्रमात बाळासाहेब सोनवणेसर स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित केली.

शाळेचे मुख्याध्यापक दीपक उशीर यांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे जिल्हा संघटक विलास येवले, योगिता नाईक, कल्पना चौधरी, अलका वाणी, शितल सूर्यवंशी, सुनील शिंदे, शुभांगी गोसावी, रवींद्र चौरे तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्याचा लाभ : सोनवणे**

पुणे येथील समकालीन प्रकाशन, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तीच्या पुढाकाराने नाशिक जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये वाचनीय, प्रेरणादायी आणि बौद्धिक विकास घडवणारी पुस्तके भेट स्वरूपात दिली जात आहेत. या उपक्रमामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना नव्या ज्ञानजगाचा लाभ मिळत आहे.वाचनाचे असंख्य फायदे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात दिसून येतात. पुस्तके वाचनामुळे चिंतनशक्ती, भाषाशैली आणि आत्मविश्वास यामध्ये वाढ होते. याशिवाय विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होऊन त्यांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला अधिक बळ मिळते. अशा पुस्तकांच्या माध्यमातून ते जीवनातील विविध पैलूंविषयी सजग व संवेदनशील बनतात.

**– बाळासाहेब दादा सोनवणे सर, उपशिक्षक, मातोश्री गी. दे .पाटील माध्यमिक विद्यालय, महिरावणी ता.जि. नाशिक**

## ऑल गेम्स असोसिएशनतर्फे राष्ट्रीयपदक प्राप्त विद्यार्थी, शिक्षकांचा गौरव

**नाशिक ।** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून ऑल गेम्स असोसिएशन, नाशिक यांच्या वतीने एका भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या मागे उभ्या असलेल्या मार्गदर्शक शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या विशेष कार्यक्रमात होरायझन अ‍ॅकॅडमी मखमलाबाद येथील क्रीडा शिक्षक आदेश पाटोळे, तसेच राष्ट्रीय पदक विजेत्या विद्यार्थिनी कीर्ती कुटे व प्रतीक्षा शिंदे यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी विविध राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत नाशिक जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. या गौरवप्रसंगी संस्थेचे संचालक रमेश आबा पिंगळे, शालेय व्यवस्थापन



समितीचे अध्यक्ष शंकरराव पिंगळे, आणि शाळेच्या प्राचार्या श्रीमती भाग्यश्री लाडोळे यांनी विद्यार्थिनींचे आणि क्रीडा शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन करत त्यांचे कौतुक केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी साधलेले यश हे सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन, पालक व शिक्षकांच्या सहकार्याचे फलित असल्याचे सांगितले. सत्कार समारंभात विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. ऑल गेम्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## प्रेमात वेडे असाल तर 'आरपार' चित्रपट पाहिलाच पाहिजे

**नाशिक ।** सध्या सर्वत्र एका मराठी चित्रपटाच्या टिझर, पोस्टर आणि गाण्यांनी हवा केलेली पाहायला मिळतेय. या चित्रपटातून एक नवी कोरी जोडी रोमँटिक अंदाजात प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचं चित्रपटातून समोर आले, तेव्हापासून साऱ्यांमध्येच उत्सुकता लागून राहिली आहे. अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री ऋता दुर्गुळे यांचा 'आरपार' हा सिनेमा येत्या १२ सप्टेंबरपासून सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाबाबतची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये लागून राहिली. शिवाय ललित आणि ऋताचा खूप मोठा चाहतावर्ग आहे आणि या चाहत्या वर्गाला या दोन्ही कलाकारांना मोठ्या पडद्यावर एकत्र पाहण्याची उत्सुकता लागून राहिली आहे. 'प्रेमात अधलं मधलं काही नसतं' हे सांगणारा हा चित्रपट आहे. ललित आणि ऋतासह चित्रपटात कलाकारांची तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. अभिनेते माधव अभ्यंकर, सुहिता हट्टे, स्नेहलता वसईकर, वीणा नायर, जान्हवी सावंत ही कलाकार मंडळीही चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. याचबरोबर चित्रपटाची खास बाब म्हणजे



चित्रपटातील गाणी. रोमँटिक गाण्यांसह चित्रपटातील जागरण गोंधळने तर साऱ्यांच लक्ष वेधलं. चित्रपटातील काही गाणी थिरकायला भाग पाडण्यास लावत आहेत. चित्रपटात ललित- ऋता यांच्यातील प्रेम आणि दुरावा याचे समीकरण पाहायला मिळणार आहेत. 'लिऑन्स मीडिया प्रॉडक्शन एलएलपी' प्रस्तुत, निर्माते नामदेव काटकर, रितेश चौधरी निर्मित 'आरपार' हा सिनेमा आहे. तर अभिनेता ललित प्रभाकरने या चित्रपटाची सहनिर्माता ही भूमिकाही सांभाळली. अभिनयाबरोबर आता ललितने निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकलं आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद या धुरा गौरव पत्की यांनी सांभाळल्या आहेत.

## संत साहित्य हे आपल्या जीवनाचे ज्ञानभांडार : प्राचार्य डॉ. पवार

**सिडको ।** येथील कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे सिडको महाविद्यालयांतर्गत गिरणारे व संत गजानन महाराज भक्त मंडळ यांच्यावतीने गिरणारे येथे गजानन महाराज यांची पुण्यतिथी सोहळा आनंदात व उत्साहात संपन्न झाली. प्रारंभी हभप नवनाथ महाराज थेटे, अतुल गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाल वारकरी व हनुमान भजनी मंडळ यांच्या वतीने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख अतिथी म्हणून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय त्रंबकेश्वर येथील प्राचार्य डॉ.दिलीप पवार उपस्थित होते. आपल्या मनोगतात डॉ. पवार यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, महाराष्ट्र ही संतांची कर्मभूमी आहे. म्हणूनच संत परंपरा ही सर्वश्रेष्ठ परंपरा समजली जाते. संत विचारांच्या सहवासात राहिल्याने आपल्या जीवनाला दिशा मिळते. आदर्शवत जीवन जगता येते. विद्यार्थ्यांनी संत साहित्य अभ्यासातून समजून घेतले पाहिजे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव आपल्या



साहित्यातून अठरापगड जातीतील समाजाला एकत्र आणले व जातीभेद नष्ट केला. अंधश्रद्धा नष्ट केल्या आणि आपले कुटुंब व समाज या घटकातून सर्व प्रकारची निरीक्षणे केली व त्याचे वास्तव चित्रण अभंगाच्या रूपातून मांडले. संतांच्या अभंगांमधून आपल्या जीवनात आत्मप्रचिती येते. अभंगांमधून आनंद द्विगुणीत होतो आणि एक आदर्शवत जीवन प्रत्येकाला जगता येते. आई-वडिलांची सेवा करा, गुरुजनांचा आदर करा, संतांचे साहित्य म्हणजे धर्म, शास्त्र आणि विज्ञान या त्रिसूत्रींचा एक संगम आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. संत गजानन महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्ताने त्यांच्या कार्याचा जीवनपट विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपान कुशारे होते. त्यांनी सांगितले की, संत साहित्य आणि संतांची परंपरा ही आपल्याला मिळालेली शिदोरी आहे. जीवनामध्ये विद्यार्थ्यांनी संत साहित्य समजून घेऊन त्याची अनुभूती घेतली पाहिजे. त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजे. व्यासपीठावर बालाजी मठाचे महंत लाल दासजी महाराज, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक माणिकराव गायकर, निवृत्ती घुले, त्रंबक गायकवाड, मविप्रचे संचालक माजी संचालक प्रशांत देवरे, काळूनाना थेटे, नाशिक तालुका शेतकी संघ संचालक दिलीप थेटे, नामदेव गायकर, दगुनाना थेटे, लुखानाना थेटे उपस्थित होते. गिरणारे गावचे भूमीपुत्र पुंडलिकनाना थेटे यांचा 75 वा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला. त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा.सोमनाथ घुले यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ.रविराज वटणे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाबाजी थेटे, शिवकार्य गड संवर्धन संस्थेचे अध्यक्ष राम खुर्दळ, डॉ. अशोक भवर, प्रा. अक्षय खातळे, विष्णू थेटे, अशोक थेटे, रोहन थेटे, भाऊराज घुले, ज्ञानेश्वर उगले, डॅनी गायकर, संपतराव थेटे, बंडू थेटे, दिनेश थेटे, विजय गायकर, कैलास घुले, विठ्ठल थेटे, बाळू पोटींदे, बबन थेटे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमात प्रसंगी गावातील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळगाव जिल्ह्यातील प्राचीन गणपती मंदिर... 'पद्मालय'

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यात श्री क्षेत्र पद्मालय हे गणपती देवस्थान निसर्गरम्य परिसर असलेल्या एका सुंदर तळ्याकाठी वसलेले आहे.प्राचीन काळातील हे मंदिर आहे.त्यावेळेस येथे घनदाट अरण्य असावे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी उजव्या सोंडेचा आणिक डाव्या सोंडेचा असे दोन स्वयंभू गणपती एकाच सिंहासनावर आहेत. प्रवाळ रत्नापासून बनलेल्या या आकर्षक गणेश मूर्ती अतिशय जागृत असल्याची भाविकांची श्रद्धा असल्याने वर्षभर दर्शनासाठी भाविकांची गर्दी या ठिकाणी असते.संकष्टी, व विनायकी चतुर्थीला विशेष गर्दी असते.दर्शनासाठी दोनदोन, तीनतीन तासही लागतात. पद्मालय नावाचं गाव अस्तित्वात नाही मात्र आजूबाजूचा परिसर याच मंदिराचे नावाने ओळखला जातो. जळगाव पासून ३० किलोमीटर आणि एरंडोल पासून १२ किलोमीटर अंतरावर हे स्थान असून एसटी बस अथवा खाजगी वाहनाने या क्षेत्री आपण येऊ शकतो. मध्य रेल्वेच्या भुसावळ-मुंबई रेल्वे मार्गावरील म्हसावद रेल्वे स्थानकापासून आठ किलोमीटर अंतरावर हे स्थान आहे. जळगावहून म्हसावद मार्गे आल्यास डोंगरमाथ्यावर थोड्याश्या चढणीच्या रस्त्याने पुढे आल्यावर श्री गणेश मंदिराच्या कळसाचे लांबूनच दर्शन घडते. मंदिराच्या अगदी समोरच शेकडो लाल , पांढऱ्या कमळांनी बहरलेला सुंदर तलाव आहे. 'पद्म' म्हणजे कमळ आणि 'आलय' म्हणजे घर यावरून या स्थानाला पद्मालय हे नाव पडले असावे. मंदिराच्या दोन दिशांना तळ्यात उतरणाऱ्या पायऱ्या असलेला दगडी घाट बांधलेला दिसतो . मंदिरावर ९० फुटी उंच कळस आहे. मुख्य कळसाभवती आठ छोटे उप-कळस असून दगडी कळसावर यक्ष, किन्नर आणि वीणा वादन करणाऱ्या नारदमुनीं यांच्या मूर्ती आहेत. सभामंडपाच्या प्रवेशद्वाराच्या वर दोन भल्या मोठ्या हातींचें शिल्प आहे .मंदिराचे समोरच वजनदार अशी पंचधातूची घंटा आहे. तिचा आवाज १५ किलोमिटर पर्यत ऐकायला येतोअसे म्हणतात .ही काशीला घडवली व "प्रवाळ क्षेत्र वासीने धरणी धराय नमः" असा मजकूर आहे. गोविंद शास्त्री बर्वे हे सिद्ध पुरुष होते.१८९५ ते १९३५ काळात त्यांचे वास्तव्य तिथे होते.त्यांनीच मंदिराचा जीर्णोद्धार केला.त्यांच्या पादुका येथे आहेत. संपूर्ण काळ्या पाषाणात बांधकाम असलेले हे मंदिर पूर्वाभिमुख असून अतिशय सुंदर असेच आहे. मंदिर परिसरातील इतर वास्तूंचे बांधकामही काळ्या पाषाणातूनच केलेले असल्याचे दिसून येते. मुख्य देवालयाच्या चहूबाजूस गणपतीची छोटीछोटी देवळे आहेत. मंदिराच्या प्रवेशद्वारा बाहेरील परिसरात पूजासाहित्य,नाश्ता, भोजन व्यवस्था असलेली असंख्य छोटीछोटी दुकाने थाटलेली असतात.




एका भव्य दगडी कमानीखालून आपण मंदिर परिसरात प्रवेश करू शकतो. तलावाकाठी असलेल्या पायवाटेवरून थोडं पुढे गेल्यावर मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला एक सव्वा तीन फूट व्यासाचे अवाढव्य दगडी जाते दिसून येते. पूर्वीच्या काळी धान्य दळण्यासाठी अशा प्रकारच्या लहान जात्यांचा वापर घराघरात होत असे. येथे असलेल्या जात्यास त्याच्या मोठ्या आकारावरून 'भिमाचे जाते' म्हणून संबोधले जाते. मंदिर जीर्णोद्धाराच्या काळात या जात्यास दोन बैल जुंपून गोल फिरवून धान्याचे बारीक पीठ केले जायचे . त्याकाळी हजारो लोकांसाठी महाप्रसादची व्यवस्था या जात्यातून निघालेल्या पिठापासून तयार केली जायची. अशीही माहिती आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर मुख्य गाभाऱ्यात डाव्या सोंडेचा आणि उजव्या सोंडेचा असे दोन गणपतींचे दर्शन होते . चांदीचे मुकुट धारण केलेल्या या मूर्तीवर दररोज जास्वंद आणि कमळांच्या फुलांची आरास केली जाते. मूर्तींमागे चांदीची प्रभावळ आहे गाभाऱ्यात चांदीचे खांब असलेल्या मखरावर रिद्धिसिद्धिच्या मूर्ती आहेत. संपूर्ण जगात श्री क्षेत्र पद्मालय हे असे तीर्थक्षेत्र आहे जेथे प्रवाळरत्न स्वरूपात प्रकट झालेले डाव्या आणि उजव्या सोंडेचे असे दोन स्वयंभू गणपती एकाच सिंहासनावर आरूढ झालेले आहेत. मंदिरातील या दोन गणेश मूर्ती पैकी एक सहस्त्रअर्जुनाने आणि दुसरी श्रीशेषाने स्थापन केल्याचा उल्लेख श्रीगणेश पुराणातील उपासना खंडात आढळतो. गणेश चतुर्थी आणि कार्तिक पौर्णिमेला या तीर्थक्षेत्री मोठी यात्रा भरते. या पुण्यपर्वात हज्जारो भाविक दर्शनासाठी पद्मालय येथे येतात. माघ शुद्ध चतुर्थीला गणेश जन्मोत्सवही थाटात साजरा करण्यात येतो. नवसाला पावणारा गणपती असल्याची भविकांची श्रद्धा असल्याने येथे दर्शनासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागतात. या स्थानाचे महत्व जाणून थोरले माधवराव पेशव्यांनी मंदिराच्या व्यवस्थापनासाठी खान्देश सुभ्यातील ३७ परगण्यांचा निम्मा महसूल पद्मालय देवस्थानास दिला होता . पद्मालय मंदिर संस्थानाला पेशव्यांची सनद मिळाली असल्याने हे देवस्थान अतिशय पुरातन असल्याचे लक्षात येते व खात्री पटते. मुख्य मंदिराच्या भोवती चार दिशांना श्री गणेशाची मंदिरे आहेत. मंदिरा पासुन एक किलोमीटर अंतरावर एका खोल दरीत असलेले भीमकुंड आहे. पर्यटक येथे आवर्जून भेट देतात. पांडव अज्ञात वासात असतांना भीम आणि बकासुर राक्षसाचे युद्ध येथे झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. युद्धात बकासुर मारला गेल्यानंतर तहान लागल्यावर भीमाने खडकावर प्रहार करून खड्डा निर्माण केला. त्यातून वर आलेले पाणी प्राशन करून भिमाने आपली तहान भागवली होती, ते भीम कुंड आज देखील या ठिकाणी पाहायला मिळते. भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणून मान्यता मिळालेल्या मोरही दिसतात. पावसाळ्याच्या सुरुवातीला मोराने फुलवलेला पिसारा बघण्यासाठी अनेक जण मुद्दाम येथे येतात. अशा या निसर्गरम्य ,आणि जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या पद्मालयाला एकदातरी गणपती दर्शन घ्यावे.नक्कीच मन आनंदाने, समाधानाने भरुन पावेल.







# नाशिक सिंचन विभागात देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली होतोय कोट्यवधींचा भ्रष्टाचार!

## बोगस बिलांच्या माध्यमातून निधीची लूट

**नाशिक ।** नाशिक सिंचन विभागात पाटबंधारे प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. धरणे, कालवे आणि उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीकरिता शासनाकडून दरवर्षी मोठा निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र प्रत्यक्ष कामे न करता, बोगस बिले सादर करून लाखो रुपयांचा निधी बेकायदेशीररित्या हडप केल्याचे उघड झाले आहे. अनेक कार्यकारी अभियंत्यांकडून शासनाची दिशाभूल करत खोटे बिल तयार करून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने मंजूर करून घेतले जात आहे. देखभाल व दुरुस्तीकरिता आलेला निधी हा वर्षभरातील भ्रष्टाचार दडपण्यासाठी तसेच तक्रारदार व माहिती अधिकार कार्यकर्त्यांना "खुश" करण्यासाठी वापरला जात असल्याची बाब समोर येत असून यामुळे विभागातील प्रामाणिक कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. हा निधी हडपण्यासाठी प्रत्यक्षात धरणे, कालवे, दरवाजे, चाऱ्या, सांडवा, कालव्यावरील गाळ काढणे, धरणावरील सुरक्षा, वीज, दरवाज्यांचे रंगकाम व रबर सील बदलणे अशी महत्त्वाची कामे



केवळ कागदोपत्री दाखवली जात असून प्रत्यक्षात अगदी तुटपुंजा स्वरूपात कामे केली जात आहे. देखभाल व दुरुस्तीची बोगस बिले वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कृपाशीर्वादाने मंजूर केली जातात. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर धरण, कालवे, पूरनियंत्रण रचना, दरवाजे,

> शेतकऱ्यांना वेळेवर पाणी मिळावे, धरणे आणि कालवे सुरक्षित राहावेत, या उद्देशाने दरवर्षी कोट्यवधी रुपयांची देखभाल व दुरुस्तीची कामे प्रस्तावित केली जातात. पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना काहीच फायदा होत नाही. धरण चौकी, कालवे, पोहोच रस्ते, दरवाजांची दुरुस्ती, कालव्यावरील गाळ व गवत काढणे यांसारखी आवश्यक कामे केवळ कागदांवर केली गेली असल्याचे दाखवले जाते. यातून थेट शासनाची फसवणूक होत असून पैशांचा अपहार केला जात आहे. या प्रकरणात पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर काढण्यात आलेल्या सर्व देखभाल-दुरुस्तीच्या बिलांची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. धरण सुरक्षितता संघटनेच्या अहवालानुसार प्राधान्याने करावयाच्या दुरुस्ती कामांकडे दुर्लक्ष होत असून, यामुळे प्रकल्पीय सुरक्षिततेलाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. नाशिक विभागातील अभियंते व वरिष्ठ अधिकारी यांच्या संगनमताने चालणाऱ्या या भ्रष्टाचारामुळे केवळ शासनाची फसवणूक होत नाही, तर धरणे व सिंचन प्रकल्पांच्या सुरक्षिततेवर गदा आली आहे. त्यामुळे यामागील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

सुरक्षा व्यवस्था अशा महत्त्वाच्या दुरुस्तीची कामे करण्याची आवश्यकता असते. मात्र प्रत्यक्षात ही कामे होत नाहीत. परिणामी, धरणे, कालवे व इतर महत्त्वाच्या बाबींची अक्षरशः वाताहात होत असून सिंचन व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे. जनतेच्या हिताशी निगडित या कामांवर कोट्यवधींचा निधी खर्च दाखवला जातो पण शेतकऱ्यांना त्याचा प्रत्यक्ष फायदा होत नाही. देखभाल व दुरुस्तीकरिता आलेला निधी केवळ प्रकल्पांच्या सुरक्षेसाठी वापरला जावा, अशी शासनाची अपेक्षा आहे. परंतु नाशिक विभागात याच निधीचा वापर वर्षभरातील भ्रष्टाचार दडपण्यासाठी, तक्रारदार व माहिती अधिकार कार्यकर्त्यांना खुश करण्यासाठी केला जात असल्याचे समोर आले आहे. म्हणजेच, भ्रष्टाचार लपवण्यासाठी भ्रष्टाचाराच्या पैशाचाच उपयोग होतो, ही अत्यंत धक्कादायक व गंभीर बाब आहे.नाशिक सिंचन विभागाचे धरणांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असून काही ठिकाणी कालव्यांची अवस्था बिकट झाली आहे. परिणामी, कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च दाखवला जात असूनही शेतकऱ्यांना पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. नाशिक विभागातील अभियंते व वरिष्ठ अधिकारी यांच्या संगनमताने चालणाऱ्या या भ्रष्टाचारामुळे केवळ शासनाची फसवणूक होत नाही, तर धरणे व सिंचन प्रकल्पांच्या सुरक्षिततेवर गदा आली आहे. त्यामुळे यामागील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

## सारूळ शिवारातून अवैध जिलेटीनचा प्रचंड साठा जप्त; नाशिक ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

**नाशिक ।** नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार व अवैध व्यवसायांचे उच्चाटन व कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेअंतर्गत वाडीव-हे पोलीस ठाणे हद्दीत मोठी कारवाई करण्यात आली. सारूळ गावच्या शिवारात अवैधरित्या साठवून ठेवलेला प्रचंड प्रमाणातील जिलेटीन पोलिसांनी जप्त केले असून सात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वाडीव-हे पोलिसांनी श्वानपथक व बॉम्ब शोधक-पथकाशी संयुक्त कारवाई करत छापा टाकला. या कारवाईत ४९ बॉक्समधील एकूण ६,१२५ जिलेटीन कांड्या, २,२०० इलेक्ट्रिक डेटोनेटर व १५० मीटर डी.एफ. वायर असा जवळपास ९५,७५० रुपयांचा स्फोटक साठा जप्त करण्यात आला. हे स्फोटक अत्यंत निष्काळजीपणे



राहत्या घराच्या मागील बाजूस व पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेले आढळले. जिलेटीन कांड्या व डेटोनेटर एकत्र ठेवल्याने कोणत्याही क्षणी मोठा विस्फोट होऊन मानवी जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकला असता, अशी माहिती तपासात पुढे आली आहे. याप्रकरणी गोरख बाजीराव ढगे (३४, रा. सारूळ),विकास नवले (रा. सारूळ), ओंकार कैलास नवले (२३, रा. सारूळ), दीपक दशरथ क्षिरसागर (३२, रा. शिंगवे बाहुला, देवळाली कॅम्प),गौरव मोहन नवले (३२, रा. सारूळ),अमित अजमेरा (पूर्ण नाव माहिती नाही),कोठावदे (पूर्ण नाव माहिती नाही) या सर्व आरोपींविरुद्ध वाडीव-हे पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम १२५, २८४, २८८ सह भारतीय स्फोटक कायदा १८८४ अंतर्गत कलम ५ चे उल्लंघन, ९ (ब) (१)(ब) व ९ (ब)(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वाडीव-हे पोलीस ठाण्याचे निरीक्षक भगवान मथुरे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि दिनकर मुंडे, पोउनि अमोल सुर्यवंशी, पोउनि एकनाथ भोईर, पोउनि सुनील शिंदे तसेच पोलिस कर्मचारी सुभाष धुळे, रावसाहेब शिंदे, जालिंदर खराटे, सचिन पिंगळ, सचिन कदम, तुषार कापडणीस, रविराज जगताप यांच्या पथकाने केली. पुढील तपास वाडीव-हे पोलीस करत आहेत.

## भर पावसात सावरकरनगरमध्ये पाणीबाणी

**नाशिक ।** गंगापूर रोड येथील सावरकर नगर परिसरातील लोकसंख्या गेल्या काही दिवसांपासून पाणीटंचाईला तोंड देत आहेत. हातात बादल्या व डोक्यावर हंडा, कळशी घेऊन आबालवृद्ध घराच्या बाहेर पडू लागले आहेत. ब्रह्मेचा इस्टेट मधील जवळपास सर्व बंगले व सोसायट्यांमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे प्रचंड हाल सुरू झाले आहेत. अशा अवस्थेत पिण्यासाठी व कुटुंबातील सर्व घटकांना विविध कामासाठी पाणी उपलब्ध नसल्याने अखेर टँकर बोलवावे लागतात.

विशेष म्हणजे टँकरवाले अव्वाच्या सव्वा पैशांची मागणी करू लागले आहेत. महापालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे लोकांना आर्थिक संकटाला ही सामना करावा लागत आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला अनेक वेळा तक्रार देऊनही या प्रश्नावर त्यांच्याकडून काहीच तोडगा काढला जात नाही. असे म्हटले जाते की परिसरातील पाण्याची टाकी अर्धी देखील भरत नाही. त्यामुळे अत्यंत कमी दाबाने



नळाला पाणी येत आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली नाही, तर गंगापूर रोडवर रास्ता रोको केल्याशिवाय कोणताही पर्याय शिल्लक दिसत नाही. आता महापालिकेला अनेकदा निवेदने देऊनही कार्यवाही होत नाही. पाण्याची टाकीच अर्धी भरत असल्यामुळे कमी दाबाने पाणी येते, असे मनपा कर्मचारी सांगतात. परंतु पाणी भरपूर उपलब्ध असतानाही हा प्रकार का होतो किंवा पाण्याची टाकी का भरत नाही याबाबत कोणताही खुलासा करायला मनपा तयार नाही. लवकरच जेहान सर्कल येथे परिसरातील नागरिकांकडून मोठे आंदोलन उभे करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

## वाचन संस्कृती जोपासण्यासाठी वाचनालय, अभ्यासिका आवश्यक : आ. ढिकले

**नाशिक ।** वाचनामुळे आत्मविश्वास वाढतो,व्यापक दृष्टीकोन होतो आणि सर्वांगीण विकास साधता येतो.आयुष्यभर शिकण्याची प्रेरणा वाचनातून मिळत असते तसेच वाचन संस्कृती जोपासण्यासाठी वाचनालय आणि अभ्यासिका आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार अ‍ॅड.राहुल ढिकले यांनी केले. पंचवटी मधील रास-बिहारी मेरी लिंक रोडवरील अवधूत कॉलनीत अवधूत प्रतिष्ठानच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या श्री दत्त मंदिराच्या भूमिपूजन समारंभाप्रसंगी आमदार अ‍ॅड.राहुल ढिकले बोलत होते.

अध्यक्षस्थानी अवधूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. दिलीप अहिरे होते. यावेळी आ. ढिकले यांनी कॉलनीतील सर्व रहिवासी नागरिक बंधू आणि भगिनी यांच्या अपेक्षा नक्की पूर्ण केल्या जातील असे सांगून याठिकाणी वाचनालय, अभ्यासिका, मंदिराचा सभामंडप आपल्या आमदार निधीतून पूर्ण करून देण्याचे सांगितले. याप्रसंगी माजी नगरसेवक अरुण पवार, सौ.शालिनीताई पवार, रुचीभाऊ कुंभारकर, धनंजय पप्पू माने, इंजिनिअर

### अवधूत कॉलनीत श्री दत्त मंदिराचे भूमिपूजन उत्साहात



जगदीश पाटील उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री गुरुदत्त प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढवून आणि कुदळ मारून मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. कलाकार श्रीकांत गायकवाड यांनी भक्तिगीते सादर केली. स्वागत प्रास्ताविक प्रा.दिलीप अहिरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप सोनवणे यांनी केले. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव अ‍ॅड. राजेंद्र डोखळे, गणपत शिंदे, प्रवीण नागरे, जिभाऊ सोनवणे, भिमाजी शेळके, निकम साहेब, व्ही.एम.खैरनार, रोहित गोसावी, एम.के.शिवहारे, श्यामराव सस्कर, गिरीश ढोक, रघुनाथ पोटकुळे, सोमनाथ बच्छाव, भूषण पाटील, प्रदीप घोसे, स्वप्नील गोसावी, माधव चव्हाण,ओम परदेशी, दीपक बोरसे, दिनेश शिरोळे, प्रभाकर बोराडे यांच्यासह सर्व रहिवाशी नागरिक आणि महिला उपस्थित होत्या. जेष्ठ नागरिक आणि महिला यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

## ➤ महत्त्वाचे

### सार्वजनिक वाचनालयाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

**सिन्नर ।** येथील सार्वजनिक वाचनालयाच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ माजी प्राचार्य पी.एस. गंगावणे, प्रमोद चोथवे, अ‍ॅड.अविष्कार गंगावणे यांच्या



हस्ते सिध्देश्वर मंदिरात श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी अध्यक्ष पदाचे उमेदवार अ‍ॅड.शिवाजीराव देशमुख, उपाध्यक्ष पदाचे उमेदवार नामदेव कोतवाल, राजेंद्र अंकार, शामसुंदर झळके, गोपाळ बर्के, अजय शिंदे, राजाराम मुंगसे, डॉ. कल्पना परदेशी, धनंजय खर्डे, प्रमोद पवार, सोहील बोहरी सौ.अंकार आदी उपस्थित होते. सभासद दत्ता वायचळे यांनी शहराचे सांस्कृतिक वैभव टिकवण्यासाठी परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

### अ. भा. ओतारी समाजातर्फे भटके विमुक्त दिवस साजरा

**नाशिक ।** ओतारी समाजासह सर्व भटक्या व विमुक्त जमातीसाठी (व्ही जे एन टी) महाराष्ट्र शासनाने 31ऑगस्ट हा दिवस भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा करणेबाबत शासन निर्णय पारित केला आहे. त्या शासन निर्णयानुसार भटके विमुक्त दिवस हा महाराष्ट्र शासनाचे वतीने सामाजिक न्याय



विभाग हॉल, नासर्डी पुलाजवळ, पुणे रोड, नाशिक येथे इतर मागास बहुजन कल्याण विभाग नाशिक यांचे वतीने साजरा करण्यात आला. समाजातील सर्व उपस्थित अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय अखिल भारतीय ओतारी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष किरण वांद्रे, दीपक ओतारी, अरुण खेडवन यांचा सत्कार प्रमुख पाहुणे सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नाशिक संतोष चव्हाण यांच्यावतीने करण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी नाशिक जिल्हा ओतारी समाजाचे वतीने महाराष्ट्र शासनास आभार पत्र देण्यात आले. यावेळी किरण वांद्रे यांनी व्यासपीठावरून अखिल भारतीय ओतारी समाज व नाशिक जिल्हा ओतारी समाजाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, महाराष्ट्र शासनाचे तसेच अधिकारी वर्ग यांचे आभार मानले.

### नदी प्रदूषित करण्याऐवजी मूर्तीदानाला मोठा प्रतिसाद

**नाशिक ।** 'कुशेशय फाउंडेशन' आणि 'सेव्ह वन्स लाइफ' यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑगस्ट रोजी गंगापूर रोड, बापू पूल येथे पाच दिवसाच्या गणपतीचे विसर्जन करणाऱ्या नागरिकांना आव्हान केले की, मूर्ती, निर्माल्य नदीत टाकू नका. आमच्या फाउंडेशनकडून गेली सहा वर्ष जनजागृती अभियान आम्ही करत आहोत. सर्व सुजाण नागरिकांनी आम्हाला सहकार्य केले. नदी प्रदूषित न करता मूर्तीचे, निर्माल्य, प्रसाद यांचं दान केलं. पाच तासांमध्ये दीड हजार मुर्त्यांचं दान नागरिकांनी केले. यासाठी आम्हास महानगरपालिका, पोलीस यांचे अनमोल सहकार्य मिळाले, असे फाउंडेशनने सांगितले.

### पद्मावती दिवे यांचे निधन

**नाशिक ।** माजी महापौर अशोक दिवे यांच्या पत्नी आणि माजी नगरसेवक प्रशांत



दिवे, नगरसेवक राहुल दिवे यांच्या मातोश्री पद्मावती अशोक दिवे (वय ६८ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. आहे. आगरटाकळी येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

## हिरावाडी रस्त्यावरील शीशमहल देखाव्याने वेधले गणेशभक्तांचे लक्ष

**नाशिक ।** यावर्षी त्रिमूर्ती नगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाने शीश महालाचा सुरेख देखावा सादर केला असून, भाविकांची प्रचंड गर्दी बघावयास होत आहे.

गेल्या २७ वर्षापासून पंचवटी येथील हिरावाडी रोड परिसरात त्रिमूर्ती नगर कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व मदत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली हिरावडी रोड येथील त्रिमूर्ती नगर येथे दरवर्षी वेगवेगळे देखावे सादर करून विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. मंत्री छगन भुजबळ, समीर भुजबळ व दिलीप खैरे यांच्या प्रेरणेतून या मंडळाची स्थापना करण्यात आली. यावर्षी त्रिमूर्ती नगर कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र




मंडळाने शीश महालाचा सुरेख असा देखावा सादर केला असून, भाविकांची प्रचंड गर्दी बघावयास मिळत आहे.

नाशिक मधील त्रिमूर्ती नगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ यंदाच्या गणेशोत्सवात एक अनोखा आणि विशेष देखावा साकारला आहे. या मंडळाच्या गणपतीची विशेषता म्हणजे त्यांची भव्य इच्छापूर्ती गणेश मूर्ती, जी नाशिककर आणि गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेते. यंदा मंडळाने ६० x ३० चे भव्य स्टेज उभारून शीश महालाचा देखावा साकारला आहे. शीश महाल दिसण्यास सुरेख असल्याने याची एक वेगळी विशेषतः आहे. देखाव्यासाठी फायबरचा वापर करण्यात आला असून हिरावाडी रोड परिसरातील त्रिमूर्ती नगर येथे ६० x ३० चे भव्य स्टेज उभारण्यात आले आहे. त्रिमूर्ती नगर कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व मदत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्य करत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील रक्तदान शिबिर, महिलांचे अथर्वशीर्ष स्तोत्र पठण, लहान मुलांसाठी दरवर्षी गणेशोत्सवात वेगवेगळ्या स्पर्धांचे मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी गणेशोत्सव काळात होम मिनिस्टर या खेळाचे विशेष आकर्षण महिलांमध्ये असून दररोज लकी ड्रॉ मधून ३ महिलांना साडीचे बक्षीस वाटप करण्यात येत आहे. त्रिमूर्ती नगर कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या देखावा व इच्छापूर्ती गणेश मूर्तीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक व विविध क्षेत्रातील मान्यवर येतात, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष सागर तांबे, कार्याध्यक्ष मयूर गोसावी व सहकार्याध्यक्ष सागर पुरकर यांनी दिली. संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांचे कार्य सामाजिक व धार्मिक असून उल्लेखनीय आहे.

**ग्रामपंचायत गोंदेगाव, ता. निफाड, जि. नाशिक.**

जा.क्र.०२/ग्रा.पं./२०२५ दि.०१/०९/२०२५

पत्ता- ग्रामपंचायत कार्यालय, गोंदेगाव, ता. निफाड, जि. नाशिक.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| ०१ | १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, गोंदेगाव, ता.निफाड येथे स्ट्रीट लाईट बसविणे. **(बी-१ निविदा)** **निविदा रक्कम- ८,००,०००/-** | दि.०७/०९/२०२५ वेळ-सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयात. |

टीप- १) निविदा सादरीकरण हे दोन लिफाफा पध्दतीने (Technical & Financial Bid) सादर करणे आवश्यक आहे. २) निविदा देकार १५% दराने असल्याने उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीत रक्कम धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ५ दिवसांचे आत सादर करणे आवश्यक राहील. ३) सदर काम केल्याचा ग्रामपंचायतीचा अनुभव दाखला आवश्यक आहे. ४) सदर निविदा प्रक्रिया राबविणे, रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायत गोंदेगाव यांनी राखून ठेवला आहे.

सही/-

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत गोंदेगाव, ता. निफाड**

कोणत्याही मार्गाने का होईना मोठ्या प्रमाणावर पैसा कमवायचा हे उद्दिष्ट सरकारमधील काही राजकीय नेत्यांनी ठरविलेले दिसते. रोहित पवार, संजय राऊत, सुषमा अंधारे अशी विरोधी पक्षातील मोजकी मंडळी तोफा डागत असल्या, तरी त्याची दखल घ्यायची नाही असेही ठरल्यासारखे दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबतीत 'दक्ष' असले तरी ज्यांना मंत्रिमंडळात घेतलं त्यापैकी अनेक मंत्री भ्रष्ट व वादग्रस्त आहे. परंतु त्यांनी घेतलेले निर्णय रद्द करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे की नाही? पण त्यांच्याकडूनही असे निर्णय रद्द होत नसल्यामुळे 'एक ही हमाम में सब नंगे' असे आता वाटू लागले आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मंत्री संजय शिरसाठ यांचे संभाजीनगर मधील एक हॉटेल व नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील जमिनीचे काही व्यवहार सार्वजनिक केले. त्यामुळे तातडीने शिरसाठ यांनी हॉटेलच्या व्यवहारातून माघार घेतली. मात्र महाराष्ट्राला योग्य तो संदेश पोहोचला होता. भारतीय जनता पक्षाचे व पर्यायाने महायुतीचे सरकार आहे असे म्हटले जाते. परंतु 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' या म्हणीप्रमाणे प्रत्येकजण हात धुवून पैसा कमविण्याच्या मागे लागलेले दिसतात. पण मुख्यमंत्रीदेखील हतबल झाल्यासारखे वाटतात. काल परवापर्यंत फॉरेस्टच्या असलेल्या जमिनी एमआयडीसीच्या माध्यमातून पद्धतशीरपणे उद्योगपतींना देण्यामागे नक्की कोणाचा वाटा आहे हे तपासले जाईल की नाही शंका आहे. ज्या दिवशी केंद्रात आणि महाराष्ट्रात सत्ता बदल होईल, तेव्हा अशा काही गोष्टी जगासमोर येतील की, त्यामुळे संपूर्ण देशात भुकंप होईल आणि त्याचा केंद्रबिंदू नवी दिल्ली असणार आहे. आज विकास करण्याच्या नावाखाली काही आंतरराष्ट्रीय मार्केट मधुन हजारो करोडोचे कर्ज घेऊन तो पैसा काही कंपन्यांना फिरवला जात आहे, अशी चर्चा आहे. विरोधी पक्षांनी किंवा जनतेने कितीही आरडाओरड केली तरी सरकारला काही फरक पडणार नाही. निवडणूक आयोग, तपास यंत्रणा, संरक्षण यंत्रणा, न्यायपालिका सर्व काही सरकारच्या हातची कठपुतली बनली आहे. सरकार काहीही करुन अजुन दहा वर्ष तरी पायउतार होणार नाही, अशी व्यवस्था झाली की हुकूमशाहीचा अनुभव सर्वांना येईल. आज महाराष्ट्रामध्ये जे काही सत्तांतर झाले होते, ते ईडी, सीबीआयच्या जोरावरच झाले होते हे जगाला माहित आहे. जे लोक भ्रष्ट होते, ज्यांना तुरुंगात जायची भीती होती, आपली कालीमाया वाचवायची होती असा एक ग्रुप भाजपाने सत्तेच्या ताकदीवर आपल्या सोबत घेतला. हा झोल ट्रिलियन डॉलरचा असल्याचे लवकरच देशाला कळेल!

# भूखंडाचे श्रीखंड ओरपायला गर्दी होत आहे!





आमदार रोहित पवार हे सातत्याने महायुती सरकारवर जोरदार टीका करत आहेत. दरम्यान त्यांनी आपण पाच हजार कोटींचा घोटाळा उघडकीस आणणार असल्याचा इशारा दिला होता. त्यांनीच दिलेल्या माहितीनुसार कोकणातील बिवलकर नावाचे कुटुंबीय मराठा साम्राज्याच्या विरोधात ब्रिटिशांना मदत करीत असायचे. त्यामुळे ब्रिटीशांनी चार हजार एकरपेक्षा जास्त जमीन राजकीय इनाम म्हणून त्यांना दिली होती.

रोहा, पनवेल आणि अलिबाग, उरण या जिल्ह्यातील पंधरा गावात ही जमीन आहे. १९५२ मध्ये या बिवलकर कुटुंबाने गोलमाल केला. बॉम्बे सरंजाम जाहगिरी व अन्य इनामे याचा नियम १९५२ मध्ये आला. बिवलकर कुटुंब अत्यंत चतुर असल्याने त्यांनी त्यांनी गडबड घोटाळा करून ब्रिटिशांनी राजकीय इनाम म्हणून दिलेली जमीन तेथील अधिकाऱ्यांना हाताशी धरून व्यक्तीगत इनाम म्हणून दाखवली व घशात घातली.

दरम्यान सिलिंग कायदा १९६१ मध्ये येणार होता, त्यामध्ये व्यक्तिगत इनामाची जमीन कदाचित सरकारकडे जाऊ शकते, म्हणून त्यांनी ती जमीन राखीव वन म्हणून नोंद झाली आणि सिलिंग कायद्यातून हे लोक मुक्त झाले. उद्या ही वन दाखवलेली जमीन परत आपल्या नावावर घेऊ असा त्यांचा प्रयत्न होता. सिलिंग ॲक्टमध्ये १९५९ मध्ये हा गोलमाल केल्याने १९६१ ला आलेल्या कायद्यातून हे वाचले.

१९७५ मध्ये महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनियम आला, ज्यामध्ये त्यांची ही संपूर्ण जमीन शासनाकडे गेली. १९८५ पर्यंत हे बिवलकर शांत बसले. पण बिवलकर कुटुंबाने खाजगी वन संपादन कायदा जमीन यास १९८५च्या दरम्यान हरकत घेतली. यानंतर चार वर्षांनी १९८९ साली जिल्हाधिकाऱ्यांनी बिवलकर कुटुंबाचा अर्ज फेटाळून लावला. १९९० साली ते उच्च न्यायालयात गेले.

२०१४ मध्ये ऑक्टबरमध्ये उच्च न्यायालयाने बिवलकर कुटुंबाच्या बाजूने निकाल दिला. यामध्ये न्यायालयात जेव्हा युक्तीवाद सुरू होता, तेव्हा शासन आणि सिडकोकडून जे वकील होते त्यांनी सिलिंग कायद्याचा मुद्दा प्रभावीपणे मांडला नव्हता. त्यामुळे बिवलकर कुटुंबाच्या बाजूने निकाल लागला.



२०१५ साली ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली. मग सर्वोच्च न्यायलयात योग्य वकीलांचा वापर करून याला स्थगिती आणली. असे असतांना १९८५ मध्ये हरकत का घेतली? तर १९७१ मध्ये नवी मुंबई प्रकल्पाची घोषणा झाली, ज्यामध्ये ९५ गावे अधिसूचित झाली. १९७२ मध्ये अधिसूचित जमिनी सिडकोकडे देण्याचा शासन निर्णय झाला.

१९८३ मध्ये शासकिय हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला. १९८३ ते ८५ दरम्यान या जमिनी संपादीत करण्यात आल्या. यामध्ये ७१ हेक्टर म्हणजे दीडशे एकर जमीन कलेक्टर व कोर्ट ऑफ वॉड्‌र्स यांची होती, जी बिवलकर कुटुंबाकडून हस्तांतरित झाली होती. भूसंपादित जमिनीचा फायदा मिळावा म्हणून बिवलकर कुटुंबाने हरकत घेतली होती.

१९८७ मध्ये अजून एक गोलमाल केला, त्यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून बेकायदेशीर अधिसूचना आणली आणि या जमिनीवर मोबदला देखील बिवलकर कुटुंबाने घेतला.

सन १९९० ला शरद पवार जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा दि. बा.पाटील यांनी एकत्रित बसून स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी योजना पीएपीसाठी आणली. यामध्ये बिवलकरांना पैसा दिसल्याने ते पुन्हा जागे झाले आणि १९९३ ला बिवलकर कुटुंबाने सिडकोकडे साडेबारा टक्के योजनेसाठीचा अर्ज केला.

१९९४ ला सिडकोने हा अर्ज फेटाळला. १९९५, २०१०, २०२३ ला देखील सिडकोने अर्ज फेटाळले. तेव्हांचे एमडी अनिल दिघेंनी हा अर्ज फेटाळला आणि लगेचच त्यांची बदली झाली. विजय सिंघल हे नवीन एमडी झाले, त्यांनी देखील या कामासाठी नकार दिला.

असे म्हणतात की, सत्तेतील एका नेत्याने त्यांच्याशी संपर्क साधला आणि सिंघल यांनी एक कल्पना सुचवली की, सिडकोला तुम्ही अध्यक्ष बसवा आणि जी कारवाई करायची ती करा. ही पाच हजार कोटींची जमीन व्यक्तीगत बिवलकरांना देऊन टाका, जी सध्या सिडकोच्या ताब्यात आहे. म्हणजे सिडकोच्या ताब्यात असलेल्या दीडशे एकर जमीनीपैकी साडेबारा टक्के जमीन बिवलकरला देण्यासाठी अध्यक्ष नेमावा लागेल असा सल्ला तिथे असणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिला असे बोलले गेले.

१ मार्च २०२४ रोजी नगर विकास विभागाने बिवलकर कुटुंबाला जमीन वाटप करण्यासाठी आलेले पत्र सिडकोला दिले. दिघेकरांनी ज्या अहवालात बिवलकर कुटुंबाला जमीन देऊ नये असे सांगितले होते, तो अहवाल या पत्राला जोडण्यात आला.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

मध्यंतरी पैशाच्या बॅगेप्रकरणी चर्चेत आलेले मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आता याप्रकरणी गंभीर आरोप होत आहे. त्यांना १६ सप्टेंबर २०२४ मध्ये चेअरमन बनवण्यात आले. शिरसाट यांनी पहिल्याच बैठकीत बिवलकर कुटुंबाला जमीन देण्याचा निर्णय घेतला. त्या गरिबांसाठी असणारी सिडकोच्या ताब्यातील जमीन पहिल्याच बैठकीत बिवलकर कुटुंबाला दिली.

शिरसाटांनी ६१ हजार स्केअर मीटर अशी जमीन, ज्याचे बाजार मुल्य पाच हजार कोटी आहे, ही जमीन बिवलकर कुटुंबाला दिली. तेथे आता डेव्हलपमेंट सुरू होईल, पण त्यामध्ये गरिबाला घरं मिळणार नाहीत तर तिथं श्रीमंताला मिळणार आहेत.

मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटीशांना मदत केल्याप्रकरणी नवी मुंबई परिसरातील सुमारे चार हजार एकरहून अधिक जमीन ब्रिटीशांनी बिवलकर नावाच्या कुटुंबाला दिली होती. नंतरच्या विविध कायदे, नियम आणि निकालानुसार ही जमीन सरकारजमा झाली, परंतु वेगवेगळ्या प्रकारे गोलमाल करुन ही जमीन परत मिळवण्याचा बिवलकर कुटुंबाने सातत्याने प्रयत्न केला. त्यालाही त्या त्या टप्प्यावर नकार मिळाला, पण विद्यमान मंत्री संजय शिरसाठ यांनी २०२४ मध्ये सिडकोचे अध्यक्ष होताच सगळे नियम बाजूला सारून पहिल्याच बैठकीत यातील सुमारे १५ एकर जमीन या बिवलकर कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला.

या जमिनीचा बाजारभाव सुमारे पाच हजार कोटी रुपये असून या जमिनीवर सिडकोला गरीबांसाठी सुमारे दहा हजार घरं बांधता आली असती, पण गरीबांच्या हक्काची जमीन शिरसाठांनी बिवलकर कुटुंबाच्या घशात घातली.

एकीकडं पाच हजारहून अधिक स्थानिक भूमिपुत्र जमिनीसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करत आहेत, त्यांना जमीन दिली जात नाही. पण मराठा साम्राज्याविरोधात काम करणाऱ्या बिवलकर कुटुंबाला बेकायदेशीरपणे पहिल्याच बैठकीत जमीन दिली जाते, ही एकप्रकारे भूमिपुत्रांच्या बाबतीतही गद्दारीच आहे. त्यामुळं बेकायदा पद्धतीने बिवलकर कुटुंबाला दिलेल्या या जमिनीसह राज्यातील अशा प्रकारच्या सर्वच जमिनी सरकारने परत घेईल की नाही शंकाच आहे.

■ ■ ■

### राज्याच्या ऱ्हासासाठी राज्यकर्त्यांचाच हातभार

बिवलकर कुटुंबाला नगरविकास मंत्री आणि सिडको अध्यक्षांनी मनमानीपणे पात्र ठरवले. हा संपूर्ण कारभार सुलभ करण्यासाठी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट यांची अवघ्या २५ दिवसांसाठी सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. नेमक्या याच काळात जमीन वाटप घाईघाईने करण्यात आले. आजही या भागातील हजारो प्रकल्पग्रस्त सिडकोच्या वाटप योजनेंतर्गत जमिनीपासून वंचित आहेत. गरीब आणि अल्पभूधारक प्रकल्पग्रस्त कुटुंबांसाठी जमीन उपलब्ध नसल्याचा दावा सिडकोचे अधिकारी निर्लज्जपणे करतात. आश्चर्याची बाब म्हणजे असे वाटप करताना कोणतेही अडथळे आले नाहीत. राज्याच्या विकासाचा ऱ्हास करण्यात आता राज्यकर्त्यांनीच हातभार लावला आहे, याचे हे उत्तम उदाहरण ठरले. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या राजकीय नेत्यांना व सिडको अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा होईल की नाही शंकाच आहे. महसूल विभागाच्या संगनमताने हा घोटाळा झाला. नगरविकास विभाग, सिडकोचे अधिकारी, मंत्री यांनी सरकार आणि जनता दोघांचीही फसवणूक केली आहे. याला शेवटी जबाबदार कोण ?

# चार्वाक : पहिला समाजसुधारक

चार्वाक, प्राचीन भारतातला पहिला समाजसुधारक... त्याच्या बायकोच्या लक्षात येत नव्हतं की नवरा नेमकं का करतोय हे काम? आपला नवरा उगीचंच लोकांना 'बुद्धी वापरा, अंधविश्वास ठेवू नका' असं सांगत फिरतोय. चमत्कार म्हणून कायतरी असतं की.. जुनीजाणती माणसं काय येडी हायेत का? असं तिचं म्हणनं होतं.

एका मध्यरात्री चार्वाकानं आपल्या बायकोला गावच्या वेशीजवळ नेलं. तिथनं धुळीच्या रस्त्यावर हाताचे पंजे विशिष्ट पद्धतीनं उठवत उठवत तो गावातल्या चौकापर्यंत आला. नंतर दोघंबी घरी गेले...

दुसऱ्या दिवशी सकाळी तो पुन्हा बायकोला घेऊन चौकात आला. धुळीतल्या खुणा बघून गांवातली लोकं एकमेकांत चर्चा करायला लागलेवते. एका बुजुगार्नं सांगीतलं. हे लांडग्याच्या पावलांचे ठसे आहेत. सगळ्यांनी त्यावर विश्वास ठेवला. 'रात्रीच्या वेळी लांडगा येतोय', अशी अफवा पंचक्रोशीतल्या घराघरात पसरली.

हे सगळं चार्वाक आणि त्याची बायको यांच्यासमोर घडलं. चार्वाकानं बायकोला विचारलं, या धुळीत हे काय आहे? ती म्हणाली, 'हे तुमच्या हाताचे ठसे आहेत! तो म्हणाला, कायतरीच काय? गांवच काय अख्खी पंचक्रोशी म्हणतीय, हे लांडग्याच्या पावलांचे ठसे आहेत.. ते काय वेडे आहेत का? यावर ती म्हणली, पंचक्रोशीतल्याच काय, सगळ्या जगातल्या लोकांनी येऊन मला तसं सांगितलं, तरी मी ते खरं मानणार नाही. कारण, हे ठसे तुम्ही आपल्या हातांनी उठवल्याचं मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं आहे.

चार्वाक म्हणाला, मग इतकी वर्षं मी तरी लोकांना दुसरं काय करायला सांगतोय ?

विवेकी विचार म्हणजे काय? याचं याहून चांगलं उदाहरण नाय माझ्या भावांनो. विवेकी माणूस ऐकलेली गोष्ट नीट पडताळून पाहून, परीक्षा करून मग खरं-खोटं, योग्य-अयोग्य ठरवतो. मुर्ख माणूस दुसरा सांगेल ते ऐकून आंधळा विश्वास ठेवतो.

आज आपण सगळे सुशिक्षित आहोत. कुठलीबी गोष्ट असूद्या... व्हॉटसॲपवरचा फॉर्वडेड मेसेज असू द्या, नायतर न्यूज चॅनलवरची बातमी असू द्या... त्या गोष्टीची नीट, चारीबाजूनी, मेंदू वापरून चिकीत्सा केल्याशिवाय आंधळेपणानं विश्वास कसा ठेवू शकतो आपण?

'आपली बुद्धी वापरायचं स्वातंत्र्य', 'आपला विवेक वापरायचा अधिकार' या निसर्गाने आपल्याला दिलेली लै लै लै मोलाच्या देणग्या हायेत, त्याचा व्यवस्थित वापर करा, हे सांगीतलं होतं पाच हजार वर्षांपूर्वीच्या चार्वाकांनी... अडीच हजार वर्षांपूर्वीच्या बुद्ध, बसवण्णा, चक्रधरस्वामींनी... तीनशे वर्षांपूर्वीच्या तुकोबारायांनी.. आणि आजच्या दाभोलकरांपर्यन्त सगळ्यांनी!

चार्वाकाला लोकांनी जाळून मारलं... चक्रधरस्वामी आणि तुकोबाराया अचानक बेपत्ता झाले...कुणी म्हणे तुकोबा गरूडावरून वैकुंठी गेले..कुणी म्हणे चक्रधर उत्तरेकडे निघून गेले.. आणि दाभोलकरांना तर... असो.

विवेकी विचार करा, असे सांगणाऱ्यांना अभिवादन करण्यापेक्षा त्यांचा 'विचार' पुढच्या पिढीत रूजवूया, मुरवूया, भक्कम करूया... चार्वाकासारखं किमान आपल्या घरात तरी ते आपण करू शकतो. एवढं जरी आपण केलं, तरी या महापुरूषांचं आपल्यासाठी जगणं आणि आपल्या सगळ्यांच्या हितासाठी मरणंबी सार्थकी लागंल !

--------------

**किरण माने**

■ ■ ■

# ५८० शिक्षकांवर अटक वॉरंट हास्यास्पद

नागपूरमधील शालार्थ आयडी पेरोल चौकशीत ५८० शिक्षक व शाळा कर्मचारी अटकेच्या विळख्यात येऊ शकतात, अशा मथळ्यांनी गेल्या काही दिवसांत अनेक मराठी वृत्तपत्रं गाजली. परंतु चौकशी पूर्ण होण्याआधी व न्यायालयीन प्रक्रिया सुरू होण्याआधीच अशी छाप निर्माण होणे म्हणजेच माध्यमांतूनच अटक वॉरंट निघाल्यासारखा भास निर्माण होतो. त्यामुळे ५८० शिक्षकांवर अटक वॉरंट ही हास्यास्पद बाब ठरणार का?

**शालार्थ आयडी घोटाळा**



अरूण सोपानराव कराळे
जिल्हा कार्याध्यक्ष,
विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ,नागपूर (महानगर)
९०९६३२६२७२

### राज्यव्यापी अहवाल अद्याप नाही

सध्या चौकशी जिल्हानिहाय सुरू असून, राज्य पातळीवरील सर्वंकष चित्र समोर आलेले नाही. जुलै २०२५ मध्ये स्थापन झालेल्या राज्य एसआयटीने अद्याप महाराष्ट्रातील संपूर्ण आढावा प्रसिद्ध केलेला नाही.

या पॅटर्नचा विस्तार झाला, तर १५ हजार हून अधिक शिक्षक, मुख्याध्यापक व अनुदानित शाळांचे प्रशासक चौकशीत सापडू शकतात, असा अंदाज जुलै महिन्यातच वृत्तपत्रांत वर्तविला होता. अलीकडे जळगाव व जालना येथील वृत्तपत्रांत ३ हजार ते ७ हजार कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या बातम्या छापल्या गेल्या असून, या अंदाजाला अधिक बळकटी मिळते आहे.

### आकड्यांपलिकडे परिणाम:

- आजवर माध्यमांचे लक्ष फक्त शिक्षक व प्रशासकीय गैरव्यवहारांवर राहिले आहे. परंतु यामुळे थेट शैक्षणिक व सामाजिक परिणाम होणार आहेत.
- जर १० हजार शिक्षकांवर कारवाई झाली, तर जवळपास २ लाख विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत होईल.
- याचा थेट परिणाम सुमारे ४ लाख पालकांवर होऊन अस्वस्थता व गोंधळ वाढू शकतो.

नागपूरमधील काही शाळांनी पालकांसोबत अनौपचारिक बैठकांचे आयोजन सुरू केले असून, मोठ्या प्रमाणावर निलंबन किंवा अटक झाली, तर स्थानिक समुदाय अस्थिर होण्याची भीती आहे.

### राजकीय वातावरण तापतेय

नागपूरमधील काही नेत्यांनी गेल्या आठवड्यांत शिक्षकांना पाठिंबा देणारे संकेत दिले आहेत. जर चौकशी स्पष्ट निकषांशिवाय राबवली गेली, तर ती सहजपणे शिक्षकांचा छळ म्हणून पाहिली जाऊ शकते.

शालार्थ कृती समितीने जेल भरो आंदोलन करण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. समितीची भूमिका स्पष्ट आहे, शालार्थ प्रक्रियेशी कोणत्याही प्रकारे संबंधित प्रत्येक व्यक्तीला गुन्हेगार मानले जाऊ नये.


राज्य सरकारने अनुदानित शाळांच्या बजेटमध्ये कपात केल्याने मागील काही वर्षांत ३ हजार हून अधिक मराठी माध्यम ग्रामीण शाळा बंद पडल्या आहेत. शालार्थ चौकशीचा परिणाम याच मराठी समाजावर होणार असून, तो आधीच असुरक्षित घटक मानला जातो.

### निष्कर्ष

मराठी माध्यम अनुदानित शिक्षण कमकुवत करून खासगी शिक्षणाला चालना दिल्याचे आरोप आधीच होत आहेत. त्यात शालार्थ चौकशीचा सूर जर अटक व छळाच्या दिशेने गेला, तर ह्रघोटाळा चौकशीह्व ऐवजी शिक्षकांचा छळ असा कथानक पुढे सरकू शकतो, अशी चिंता व्यक्त केली जाते.

■ ■ ■

# २० वर्षे काम न करता पगार मिळवण्याचा खटला



आगळंवेगळं

फ्रान्समध्ये, एका महिलेने २० वर्षे काम न करता पगार मिळाल्याने तिच्या कंपनीविरुद्ध खटला दाखल केला. प्रत्यक्षात, ५९ वर्षीय लॉरेन्स व्हॅन वासेनहोव्ह १९९३ मध्ये एका मोठ्या टेलिकॉम कंपनीत रुजू झाली. नंतर तिला अपस्मार आणि हेमिप्लेजिया (शरीराच्या एका भागाचा अर्धांगवायू) झाला. त्यानंतर तिला सेक्रेटरीची नोकरी देण्यात आली.

२००२ मध्ये, कंपनीने तिला स्टँडबायवर ठेवले. २० वर्षांहून अधिक काळ तिला कोणतेही काम देण्यात आले नाही. कोणतीही जबाबदारी नव्हती. कोणाशीही संपर्क नव्हता. ती म्हणते, 'मला असे वाटले की मी अस्तित्वातच नाही.' ती म्हणाली की घरी काम न करता पगार मिळवणे हा फारसा फायदा नाही, ते खूप कठीण आहे.

**कंपनीवर भेदभावाचा आरोप**

आता लॉरेन्सने ऑरेंज कंपनीवर खटला दाखल केला आहे. कंपनीने तिच्या आरोग्याच्या गरजांकडे दुर्लक्ष केल्याचा तिचा आरोप आहे. फ्रेंच कायद्यानुसार, कंपनीने तिला काम द्यायला हवे होते. लॉरेन्सचे वकील म्हणतात की हा भेदभाव आहे. कंपनी म्हणते की त्यांनी महिलेच्या वैयक्तिक परिस्थितीची काळजी घेतली होती. त्यांनी म्हटले की लॉरेन्स अनेकदा रजेवर असायची. त्यामुळे तिला कोणतीही नवीन भूमिका देता येणार नाही.

■ ■ ■

# मोबाईलच्या पडद्यामागे हरवतेय बालपणाची निरागसता

नागपूरमध्ये अलीकडेच घडलेली एक हृदयद्रावक घटना संपूर्ण समाजाला हादरवून गेली. एका अल्पवयीन मुलाने अपयशी प्रेमसंबंधामुळे १६ वर्षीय मुलीची भररस्त्यावर निर्दयपणे हत्या केली. ही घटना फक्त एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर समाजासमोर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे झ आपल्या मुलांच्या मानसिकतेचं घडणं आज कोणत्या दिशेने चाललं आहे?

आज मोबाईल मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. शिक्षण, मनोरंजन, मित्रमैत्रिणींसोबतचा संवाद यासाठी तो आवश्यक झाला आहे. पण त्याचं चुकीच्या प्रकारे व अतिरेकी प्रमाणात होणारं वापर मुलांच्या मनावर घातक परिणाम करत आहे. मोबाईलवरील हिंसक खेळ, अश्लील व्हिडिओ, उत्तेजक रील्स आणि तात्काळ प्रतिसादाची सोशल मीडिया संस्कृती यामुळे मुलांची सहनशीलता कमी होत आहे. थोडासा अपयश किंवा नकार मिळाल्यावर अनेक मुलं राग, सूड आणि हिंसक मार्ग स्वीकारतात.

याहूनही चिंताजनक बाब म्हणजे, पालकांनी मोबाईल मर्यादित वेळेसाठी द्यावा किंवा काही वेळेस नाकारावा, तर अनेक मुलं टोकाची पावलं उचलतात. आत्महत्येचा प्रयत्न, घर सोडून जाणं, भांडणं करणं या घटना समोर येतात. म्हणजेच मोबाईल मुलांच्या जीवनाचं केंद्रबिंदू बनलं असून त्याशिवाय ते स्वतःला असहाय समजू लागले आहेत. ही व्यसनाधीनतेसारखीच परिस्थिती आहे.

परंतु, समस्या केवळ मोबाईलच्या वापरात नाही, तर त्यावर सहज उपलब्ध असणाऱ्या साहित्यामध्येही आहे. गूगल, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब यांसारख्या मंचांवर अश्लील साहित्य, भडकावू व्हिडिओ व उत्तेजक रील्स मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. हे कंटेंट मुलांना वेळेआधी मोठं बनवतो आणि त्यांची नातेसंबंध व समाजाकडे पाहण्याची दृष्टि विकृत करतो.

याबाबत कायद्याने अनेक तरतुदी केल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि आयटी नियम २०२१ अंतर्गत सोशल मीडिया कंपन्यांवर अश्लील व हानिकारक कंटेंट हटवण्याची जबाबदारी आहे. तक्रार मिळाल्यानंतर २४ तासांत सामग्री हटवणे बंधनकारक आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

भारतीय दंड संहिता कलम २९२, २९३* अश्लील साहित्याच्या प्रसारावर दंडाची तरतूद करतात. तसेच POCSO कायदा २०१२ नुसार अल्पवयीन मुलांना अश्लील साहित्य दाखवणे हा गंभीर गुन्हा मानला जातो.

सरकारने हे नियम अधिक कठोर करून अश्लील व उत्तेजक रील्स तयार करणाऱ्यांवर, त्यांचा प्रसार करणाऱ्यांवर आणि त्याला प्रोत्साहन देणाऱ्या प्लॅटफॉर्म्सवर कठोर कारवाई करायला हवी.

तसेच कंटेंट फिल्टरिंग, वयाची पडताळणी (age verification) आणि मुलांसाठी सुरक्षित डिजिटल स्पेसची अंमलबजावणी बंधनकारक करणे आवश्यक आहे.


परंतु केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाही. पालक व शिक्षक यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. घरात संवादाचं वातावरण असायला हवं. मुलांना योग्य-अयोग्य याची जाणीव करून द्यायला हवी. मोबाईलचा मर्यादित व शिस्तबद्ध वापर कसा करावा हे शिकवायला हवं.

शाळांमध्ये डिजिटल साक्षरतेसोबत भावनिक शिक्षणालाही महत्त्व द्यायला हवं, जेणेकरून मुलं अपयश स्वीकारणं, राग नियंत्रित करणं आणि नातेसंबंधात मर्यादा पाळणं शिकतील.

नागपूरची घटना समाजाला स्पष्ट संदेश देते की वेळ निघून जाण्याआधी पावलं उचलणं गरजेचं आहे. मोबाईल हा स्वतःमध्ये शत्रू नाही, पण त्याचा अनियंत्रित व चुकीचा वापर निश्चितच समाजासाठी घातक ठरत आहे. मुलांच्या हातात मोबाईल देण्याआधी त्यांच्या मनात योग्य संस्कार देणं हीच खरी जबाबदारी आहे.

■ ■ ■

# कच्चे न्यूडल्स खाणे घातक





भूक लागली की काही झटपट आणि चविष्ट खाण्याची अनेकांची इच्छा होती. स्नॅक्समध्ये न्यूडल्स हा प्रकार मोठ्या प्रमाणात खाल्ला जातो. न्यूडल्स बनवताना काहींना ते कच्चे खाण्याची सवय असते. किशोरवयीन मुलांचं हे सर्वांत आवडतं स्नॅक आहे. परंतु हेच कच्चे न्यूडल्स जीवघेणे ठरू शकतात, हे तुम्हाला माहीत आहे का?

इजिप्तमध्ये एका 13 वर्षीय मुलाने नाश्त्यामध्ये एक किंवा दोन नव्हे तर 3 पॅकेट्स कच्चे न्यूडल्स खाल्ले होते. त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली. न्यूडल्स खाल्ल्यानंतर काही वेळातच त्याला पोटात तीव्र वेदना जाणवू लागल्या आणि तो अचानक उलट्या करू लागला.

कुटुंबीयांनी मुलाला ताबडतोब रुग्णालयात दाखलं केलं. परंतु डॉक्टर त्याचे प्राण वाचवू शकले नाहीत. जर तुम्हालाही कच्चे न्यूडल्स खाण्याची सवय असेल तर सावध व्हा. कारण तुमच्या आरोग्यासाठी हे अत्यंत घातक ठरू शकतं.

जर तुम्ही कच्चे न्यूडल्स अधिक प्रमाणात खाल्ले तर त्यामुळे तुमच्या पचनसंस्थेत अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉक्टरांच्या मते, इन्स्टंट न्यूडल्समध्ये सोडियमचं प्रमाण खूप जास्त असतं. हल्ढ नुसार, तुम्ही एका दिवसात फक्त २००० मिलीग्रॅम पर्यंत सोडियम खाऊ शकता. ही रोजची मर्यादा आहे.

इन्स्टंट न्यूडल्यच्या एका पॅकेटमध्ये १८२९ मिलीग्रॅम सोडियम असतं. शरीरात अधिक प्रमाणात सोडियम गेल्यास रक्तदाब अचानक वाढू शकतो आणि त्याचा परिणाम हृदयावरही होऊ शकतो.

कच्चे न्यूडल्स पचायला जड असतात. त्यामुळे मधुमेह आणि कर्करोगाचाही धोका वाढतो. कच्च्या न्यूडल्यमुळे शरीरातील पाण्याचं प्रमाणही कमी होऊन डिहाड्रेशनचा त्रास जाणवू शकतो. म्हणूनच सहसा इन्स्टंट न्यूडल्स खाऊ नये आणि खाल्ले तर ते कायम शिजवूनच खावेत, असा सल्ला डॉक्टर देतात.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### लय झालं ना बावा!

तांडवनृत्य करूनी
कां घातले थैमान
भुईसपाट झाला ना
जगाचा पोशिंदा किसान

जीवनदाता ऐसी
तुझी जगी किर्ती
निष्ठूरतेने पुराचे
बळी घेशील किती ?

पावसा रे पावसा
तू लई थकलास
आता विश्रांती घे
एक महिना झकास..

# पिंपळनेरच्या नामसप्ताहात सजीव पौराणिक धार्मिक देखावे, विविध कार्यक्रम, पालखी सोहळा, कुस्ती दंगल





विशाल बेनुस्कर

**पिंपळनेर ।** येथील श्री समर्थ सदगुरू खंडोजी महाराज यांच्या १९७ व्या नामसप्ताहानिमित्त शहरात विविध कार्यक्रम संपन्न झाले.रविवारी ३१ ऑगस्ट रोजी विठ्ठल मंदिरात पहाटे महाकाकड आरती झाली. तर रात्री ११ वाजता विठ्ठल मंदिरातून पालखीची भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात आली.या रात्रीला पूर्वीपासून पालखीची रात्र असे संबोधले जाते. रात्रभर पालखी व सजीव देखावे यांमुळे नागरिक रात्रभर जागरण करून या महोत्सवाचा आनंद घेतात.खंडोजी महाराजांच्या पादुका,३०० पेक्षा अधिक वर्षांपूर्वीची हस्तलिखित गीता व श्री कृष्णाची पुरातन मूर्ती असणाऱ्या पालखी सोहळ्यात विविध ठिकाणांहून आलेल्या दिंड्या सहभागी झाल्या होत्या.मधुर संगीत व कीर्तनाच्या तालावर भक्त पालखी सोहळ्यात



तल्लीन झाले होते.विठ्ठल मंदिरात दररोज भुपाळ्या,आरती,गीतापाठ व महापुजा,अखंड नामजप सेवा,व्याख्यान, महिलांचे भजन,हरिपाठ,पंचपदी भजन व कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे दररोज विविध मंडळांकडून पारंपारिक पद्धतीने पायदळी सोंगे,सजीव देखावे काढण्यात.३० ऑगस्ट रोजी समाधी दर्शनाच्यावेळी शांताई एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी विविध संत, देव-देवतांच्या भूमिका साकारून दिंडीची शोभा वाढवली होती.पालखी मार्गात विविध मंडळांकडून रांगोळी काढून पुष्पवृष्टी करण्यात आली.तर विविध मंडळ,सामाजिक संघटना व राजकीय पक्षाच्या वतीने पालखीचे जोरदार स्वागत करण्यात आले.१९७ वर्षाचा जातीय सलोखा आजही कायम ठेवत मध्यरात्री शहरातील जामा मशिदी समोर जहागिरदार कुटुंब व मुस्लिम बांधवांच्या वतीने पालखीचे व योगेश्वर महाराज देशपांडे यांना मानाची वस्त्रे देऊन यांचे भव्य स्वागत करण्यात आले.यावेळी अनेक मान्यवरांची,राजकीय पदाधिकाऱ्यांची व पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. पालखीच्या रात्री विविध मंडळांकडून पारंपारिक पद्धतीने पायदळी सोंगे व



पौराणिक दृश्यांवर आधारीत ५ सजीव चित्ररथ (वहन) काढण्यात आले.यामध्ये कलियुग सांस्कृतिक कला मित्र मंडळ यांच्या वतीने श्री कृष्ण लिला तर युवा संघर्ष मित्र मंडळाने महाकाली विरभद्र, भोईराज मित्र मंडळाच्या वतीने लग्न खंडोबाचे, कथा चंदनपुरीची,जागृती मित्र मंडळाने खान्देशनी आई माय मनी कानबाई आणि विश्वकर्मा मित्र मंडळाने गौतमऋषी पत्नी अहिल्यादेवी उद्धार हे वहन काढण्यात आले.१ सप्टेंबर रोजी कुस्ती मैदानावर भव्य कुस्त्यांची दंगल झाली.यावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती.या संपूर्ण यात्रेच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून अतिरिक्त पोलीस बल शहरात तैनात करण्यात आलेला आहे.

## उरलेत चार दिवस.. रात्री बारापर्यंत वाजवा

**नाशिक ।** केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार गणेशोत्सव, गौरी विसर्जन, ईद ए मिलाद व विसर्जन मिरवणूकीसाठी सलग पाच दिवस रात्री बारा वाजेपर्यंत वाद्य, ध्वनीक्षेपक वाजविण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी अनुमती दिली असून, त्याची सुरूवात करण्यात आली आहे.

गणेशोत्सवासाठी सार्वजनिक मित्र मंडळांनी लाखो रूपये खर्च करून देखावे उभे केले आहेत परंतु रात्री दहा नंतर वाद्य वा ध्वनीक्षेपक वाजविण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे.दरवर्षी हीच परिस्थिती निर्माण होवून बऱ्याच वेळा पोलीस व गणेश मंडळांमध्ये या प्रश्नावरून तणाव व वादावादी झाल्याच्या घटनाही यापुर्वी घडल्या आहेत. यंदाही सार्वजनिक मित्र मंडळांनी उत्सवाच्या दहाही दिवस रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरण्याची मुभा मिळावी अशी मागणी केली होती. मात्र केंद्रीय पर्यावरण विभागाने ध्वनीक्षेपक व वाद्य वाजविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या विशेष अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी मंगळवार (दि.२) गौरी विसर्जनापासून सलग पाच दिवस म्हणजेच गणेश विसर्जन (दि.६) पर्यंत रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व वाद्य वाजविण्यास अनुमती दिली आहे.

## नाशिक गणेश दर्शन...



कांचन पाटील



गौरी कांबळे



उषा दीपक सूर्यवंशी



राणी कुलथे



पल्लवी पटेल



अस्मिता समीर जाधव
अक्षिता दीपक जाधव




रिंकू पाटील, राणेनगर

## पाटील परिवाराने साकारला पर्यावरणपूरक सप्तश्रृंग गड



**नाशिक ।** गौरी गणपती हा सण कलाकारांच्या सृजनशीलतेला वाव देतो. यानिमित्ताने घराघरातील स्त्रीपुरूष आपल्यातील कलागुणांना वाट करुन देतात. प्रयत्नपूर्वक मेहनतीने एक देखणी कलाकृती निर्माण होते. पंचवटीत पर्यावरणपूरक देखाव्यात सुंदर सप्तशृंगगड साकारला आहे. अपर्णा पाटील व कस्तुरी पाटील या सासू-सुनांनी एकमेकींच्या मदतीने ही एकत्रितपणे सुंदर सजावट केली आहे. ती लक्षवेधी ठरली असून अनेकजण आवर्जून भेट देऊन कौतुक करीत आहेत.

निर्माण उपवन, पंचवटी येथे राहणाऱ्या चंद्रशेखर पाटील परिवाराची सप्तशृंगी माता कुलस्वामीनी आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी घरात सप्तशृंगी गडाचा देखावा करावा, अशी संकल्पना सर्वांच्या मनात आली. त्यांचे मर्चंट नेव्हीत कार्यरत असणारे चिरंजीव मयुरेश हे देखील सुटी घेऊन नाशिकला घरी आले. या देखाव्यात अपर्णा व कस्तुरी यांनी फक्त कागद व पुठ्ठे वापरले आहेत. देवीची मूर्तीही चिकण माती, कागद आणि पुठ्ठे वापरून तयार केलेली आहे. पुढाकार दोघींचा असला तरीही मयुरेश व संपूर्ण कुटुंबाच्या मदतीने सजावट करायला त्यांना जवळपास दीड महिना लागला. घरात असलेल्या या सजावटीची लांबी १० फूट आहे. रुंदी ७ फूट तर उंची ९ फूट आहे. मागील काही वर्षात त्यांनी उद्यान गणेश, कालौघात नष्ट होत चाललेली पारंपरिक वाडा संस्कृती, सोन्याचा जेजुरी गड हे देखावेसुद्धा बनवले होते. त्यांनाही भाविकांनी कौतुकाने गौरविले होते.

## विंचूरमध्ये क्षीरसागर कुटुंबात गौरी-गणपती व्रत

**विंचूर ।** हिंदू संस्कृतीतील महत्वाचा सण असलेले गौरी-गणपती (महालक्ष्मी) व्रत विंचूर येथील क्षीरसागर कुटुंबात पारंपरिक विधी आणि उत्साहात साजरे करण्यात आले. भाद्रपद शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर सुरू झालेल्या या व्रताला महिला मोठ्या भक्तिभावाने सामील झाल्या. पहिल्या दिवशी सुवासिनींनी घंटानाद आणि औक्षण करून गौरींचे स्वागत केले. पंचांग मुहूर्तानुसार त्यांना साडी-चोळी व दागिने घालून साजरे करण्यात आले. भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवून पूजन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी गौरी पूजन सोहळा पार पडला. करंज्या, पुऱ्या, लाडू, पुरणपोळी, सोळा भाज्या अशा विविध नैवेद्य पदार्थांची आरास करण्यात आली. दोन सुवासिनींना देवीरूप मानून त्यांना जेवण देऊन पूजन केले गेले. संध्याकाळी हळदी-कुंकू कार्यक्रम व गौरी दर्शनाला




महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माहेरी आलेल्या मुलींमुळे वातावरण अधिक आनंदी झाले. रात्री भजने व गौरी गाण्यांनी जागरण रंगले. तिसऱ्या दिवशी विसर्जन विधी पार पडला. दही-भाताचा नैवेद्य दाखवून आरत्या झाल्या. पाच सुवासिनींच्या हस्ते गौरींना उठवून त्यांचे विसर्जन करण्यात आले. उपस्थित महिलांना फुटाण्याचे वाटप करण्यात आले.या तिन्ही दिवसांत क्षीरसागर कुटुंबासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभागी होऊन पारंपरिक परंपरा जिवंत ठेवली.

## देवरे पाटील परिवाराचा उपक्रम : पर्यावरणपूरक गणेश विसर्जन, सामाजिक जनजागृती



**नाशिक ।** "एकट्याने शक्य नाही... पण नेहमीप्रमाणे सुरुवात आमच्या कडूनच" या भावनेतून देवरे पाटील परिवाराने यावर्षीही पर्यावरणाचे भान राखत घरच्या घरी श्रीगणेशाचे विसर्जन केले. पाचव्या दिवशी घरीच निर्मळ आणि स्वच्छ वातावरणात गणरायाला निरोप देत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश देण्यात आला. देवरे पाटील परिवार दरवर्षी सामाजिक विषयांवर देखावे साकारून जनजागृती करतो. यावेळी देखील उभारलेल्या देखाव्याचे प्रशासकीय, राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले. मात्र, समाजात प्रत्यक्ष बदल कितपत घडतो याबाबत नितीन देवरे यांनी शंका उपस्थित केली. दर्शनासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, माजी नगरसेवक शामकुमार साबळे पाटील, माजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे, माजी नगरसेवक अनिल मटाले, भाजपाचे पदाधिकारी ॲड. अतुल सानप, पत्रकार राजेंद्र भांड यांसह अनेक मान्यवर व नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.


## शिक्षणाची गरज विषयावर सामाजिक साकारला देखावा















**नाशिक ।** गणपती उत्सवानिमित्त प्र. क्र. २३ मध्ये विनयनगर पुर्ती सोसायटी येथे गुल्हाटी परिवारामार्फत एक अति सुंदर असा सामाजिक देखावा साकारलेला आहे. त्यात गोर गरीब मुलांसाठी प्रबोधन केलेले आहे.

आज मुलांना शिक्षणाची नितांत गरज आहे; परंतु परिस्थितीमुळे मुले शिकू शकत नाहीत. त्या मुला मुलींसाठी गुल्हाटी कुटुंबियाने शिक्षणाची गरज या विषयावर देखावा साकारलेला आहे. देखावा बघण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून ते वही व पेन्सिल घेत आहेत. ते सर्व साहित्य गोरगरीब मुला-मुलींना शिक्षणासाठी गणपती विसर्जन झाल्यानंतर देणार आहेत. प्रभागातील गरीब वस्तीतील ठिकाणी व गरजू शाळेतील मुलांना ते साहित्य मोफत देणार आहेत. जेणे करून गरीब मुलांची शिक्षणाची इच्छा पूर्ण होईल या देखाव्यासाठी विना गुलाटी सचिन गुल्हाटी रीमा गुल्हाटी रणवीर गुल्हाटी यांनी मेहनत घेतली आहे.

# विविधा...



# विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

अलिकडल्या काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांत प्रचंड वाढ झाली आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची एखादी तरी बातमी असतेच. विद्यार्थी आत्महत्यांच्या वाढत्या घटनेबाबत सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे. भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत भारतातच नव्हे तर जगभर चिंता व्यक्त होत आहे.

मागील वर्षी भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल प्रसिद्ध झाला होता. नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला होता. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे.

या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. दरवर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिक आत्महत्या करत असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात होत आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे.

कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता.

ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे.

अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत.

समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचं ओझेही लादू नये.

विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

--------------

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

**विद्यार्थ्यांना मुदतवाढ**

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

यानंतर न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या.

या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वषार्तील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या. याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वषार्तील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५) :**

पदवी (Under Graduate) : १७ हजार ७७८, पदव्युत्तर (Post Graduate) : १ हजार ९२७, डिप्लोमा (Diploma) : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये SEBC आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.

यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरु करण्यात आली आहे.

सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची Ph.D. पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती :**

JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछत्रवृत्ती UGC निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल, या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षाच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी दर World Raking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.

महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

सारथी
"शाहू - विचारांना देऊया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

काशीबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई.

# मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानिमित्त..!

भारतीय लोकशाहीत राजकारण म्हणजे समाजसेवेचं एक शस्त्र असावं, लोककल्याणाची एक दिशा असावी असं अपेक्षित होतं. पण आजच्या काळात ते एक प्रकारचं सत्तेचं दुकान बनलं आहे.

सत्ताधारी कुठलेही असोत त्यांच्यासमोर लोटांगण घालून, आपली विचारधारा विसरून, जनतेशी केलेली वचने पायदळी तुडवून, ह्यकोणत्याहीह्न गाडीत बसण्याची तयारी ठेवणारे दलबदलू नेते आपल्या राज्याच्या राजकीय वास्तवात दुर्दैवाने वाढतच आहेत.जनता फसते, निराश होते, पण पुन्हा-पुन्हा विश्वास ठेवते.

प्रत्येक निवडणुकीत तिला वाटतं की, कदाचित या वेळेस आपल्याला खरा नेता मिळेल. पण निवडणुकीनंतर दलबदलाची लगबग पाहून तीच जनता हादरून जाते.

पण ह्या सगळ्या गोंधळात, स्वार्थी व्यवहारात आणि तत्त्वहीन राजकारणाच्या दलदलीतही एखादा माणूस आपल्या शब्दाशी, आपल्या तत्त्वाशी, आणि आपल्या समाजाशी ठाम उभा राहिला, तर त्याचं रूपांतर थेट लोकनायकात होतं. आज महाराष्ट्रात त्या रूपात एकच नाव लोकांच्या ओठांवर आहे... मनोज पाटील जरांगे.

**आंदोलनाचं अनोखं स्वरूप**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या जमिनीत एक वेगळीच चळवळ पेटलेली आहे. ही चळवळ ना पैशाने चालते, ना पदाच्या मोहाने. या आंदोलनात जी गर्दी जमली आहे ती रोजंदारीवर आलेली गर्दी नाही.

राजकीय सभांना गर्दी जमवण्यासाठी नेते लोकांना दारू-मटन देतात, बसांची व्यवस्था करतात, हातावर पैसे ठेवतात. पण जरांगेंच्या आंदोलनाला आलेली जनता ही चटणी-भाकर खाऊन, स्वतःच्या खर्चाने आलेली आहे. हाच आंदोलनाचा आत्मा आहे.

एका किलोमीटरचा टप्पा पार करण्यासाठी जेव्हा पाच तास लागतात, मुंबई संपूर्ण इकडे आंदोलकात दिसतात तेव्हा कळतं की हा लोकसागर केवळ जमाव नाही तर तो लोकांच्या हृदयातून उगम पावलेला एक प्रवाह आहे.

**निवडणुकीतील समीकरणे आणि लोकांचा विश्वास**

निवडणुकीच्या वेळी अनेक जणांनी जरांगे फॅक्टर चालला नाही, अशी चर्चा केली होती. कारण मतदारांनी आपल्या मनाप्रमाणे मतदान केलं. पण त्याच मतदारांच्या मनात जरांगे कायम राहिले.राजकारणात मतदार मनाला जपतो, आणि आंदोलनात हृदयाला. जरांगेंच्या आंदोलनाला जी जनसमर्थनाची लाट मिळाली आहे ती हेच दाखवते की, लोक हृदयातून अजूनही जरांगेंसोबत आहेत.

**मी फुटत नाही, मॅनेज होत नाही**

जरांगेंनी दिलेलं एक वाक्य आज लोकांच्या तोंडून तोंडाला जातंय...मी फुटत नाही, मी मॅनेज होत नाही. या वाक्यात त्यांचा संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा सार आहे. पैसा, सत्ता, पद यांचं मोहजाल असंख्य नेत्यांना फसवत आलं आहे. कोट्यवधींच्या ऑफर आल्या तरी जरांगे मॅनेज झाले नाहीत. लोक ह्याच गुणासाठी त्यांना देवमाणूस म्हणतात.

हे वाक्य म्हणजेच दलबदलू नेत्यांसाठी आरसा आहे. कारण त्यांचं संपूर्ण आयुष्यच फुटणं आणि मॅनेज होणं यावर आधारलेलं आहे.

**जनतेचा जीव ओवाळून टाकणारा विश्वास**

गेल्यावर्षी अंतरवाली सराटीत जेव्हा आंदोलन सुरू होतं, तेव्हा एका रात्री अशी अफवा पसरली की जरांगेंना पोलीस ताब्यात घेतील. थोड्याच वेळात शेकडो तरुण हातात दांडके घेऊन गावात दाखल झाले. घोषणांचा गजर झाला... जरांगेंच्या जीवावर कुणी हात घालायचा नाही....

हा विश्वास पैसा देऊन विकत घेता येत नाही. तो मिळतो आपल्या त्यागातून, उपोषणातून, निस्वार्थी संघर्षातून.




**कुणबी प्रमाणपत्र..आशेची पहाट**

आज मराठा घराघरात जरांगेंचे फोटो लावलेले दिसतात. त्याचं कारण म्हणजे लाखो कुटुंबांच्या लेकरांना कुणबी प्रमाणपत्र मिळालं. कुणी पोलीस दलात दाखल झालं, कुणी महावितरणमध्ये नोकरीला लागलं, कुणी एमबीबीएसमध्ये दाखल झालं.

ज्यांचं उच्चशिक्षण महागड्या फीमुळे थांबलं होतं, त्या स्वप्नांना नवी दिशा मिळाली. घराघरात आनंद उगवला. म्हणूनच मराठा समाज म्हणतो..आरक्षण हे आमचं स्वप्न नव्हे, तर आमचं भविष्य आहे. आणि हे भविष्य जरांगेने दिलं.

**मराठा समाजाला हवे होते असंच नेतृत्व**

दशके-दशकं मराठा समाजाने अनेक नेते पाहिले. कुणी राजकारणात मोठे सम्राट झाले, कुणी उद्योगपती बनले. पण समाज मात्र मागेच राहिला. सत्तेत जाऊन समाजाचा प्रश्न सोडवण्याऐवजी बहुतेक नेत्यांनी आपली पिढी गब्बर बनवली.

म्हणूनच मराठा समाजाला हवा होता असा माणूस, जो विकला जाणार नाही, जो झुकणार नाही. तो माणूस म्हणजे मनोज पाटील जरांगे होय, हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

**तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची ताकद**

जरांगेंच्या आंदोलनाला थांबवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी कायदेपंडित आणले, पोलिसांचा वापर केला, दबाव टाकला. पण काहीही करून ते यशस्वी झाले नाहीत. कारण जरांगे यांच्या ओठात केवळ एकच भाषा आहे...मराठा लेकरांच्या उज्ज्वल भविष्याची भाषा.

त्यांचा अभ्यास, त्यांची तयारी, त्यांची दृष्टी यामुळे न्यायाधीश असोत किंवा पत्रकार सगळेच थक्क झाले. त्यांनी दाखवून दिलं की आंदोलन म्हणजे केवळ घोषणाबाजी नाही; आंदोलन म्हणजे अभ्यास, तळमळ आणि शिस्त.

**आंदोलनाचा नवा चेहरा सोशल मीडिया**

जरांगेंच्या आंदोलनाला माध्यमांची गरज भासली नाही. गावागावात व्हॉट्सअप ग्रुप तयार झाले. कोण कुठे थांबणार, कोणत्या गाडीनं जाणार, कुठल्या दिवशी परतणार–सगळं नियोजन त्या ग्रुपवर होतं. शिस्तबद्धपणे, स्वयंस्फूर्तीने चालणारं हे आंदोलन महाराष्ट्रातील आंदोलनांच्या इतिहासात अद्वितीय आहे.

**अफवा, चर्चा आणि जनविश्वास**

माध्यमं सतत विचारतात, जरांगेंच्या आंदोलनाला पैसा कुठून येतो? काहींचं म्हणणं, या आंदोलनामुळे समाजात फूट पडते का? तर काही जण प्रश्न करतात, जरांगे कुणाबद्दल सॉफ्ट आहेत, कुणाबद्दल कठोर आहेत?

पण ह्या प्रश्नांपलीकडे एक गोष्ट सगळ्यांना दिसते, लोक स्वतःहून आंदोलनाला येतात. राजकारण्यांना लोकांना आणावं लागतं, पैशाने जमवावं लागतं. पण जरांगेंच्या आंदोलनात लोक स्वतःच येतात. हाच त्यांचा विजय आहे.

**जरांगेंचं लोकांवरचं प्रेम**

गावोगावी आज एकच वाक्य ऐकू येतं, पाटील जसं म्हणतील तसं. ही लोकांच्या मनातली निष्ठा आहे. महात्मा गांधींनंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर असा लोकसंग्रह महाराष्ट्राने पाहिला नव्हता.

पण आज मराठा समाज म्हणतो, मनोज पाटील जरांगे हेच आमचे तारणहार आहेत.

**दलबदलूंनी घ्यावा धडा**

आज दलबदलू नेत्यांनी जरांगेंकडे डोळे उघडून पाहावं. कारण पैसा, पद, सत्ता यावर टिकणारी राजकारणाची दुनिया किती उथळ आहे, हे जरांगेंनी दाखवून दिलं.

त्यांचं नेतृत्व हे न विकलं जाणारं, न फुटणारं, न झुकणारं आहे. दलबदलू नेत्यांनी जरांगेंच्या तत्त्वनिष्ठतेतून शिकावं, कारण जनतेचा विश्वास पैशानं विकत घेता येत नाही.

**निष्कर्ष**

जरांगे हे फक्त एक आंदोलनकर्ते नाहीत, तर एक जनआंदोलनाचे प्रतीक आहेत. ते मराठा समाजाच्या वेदनेचं, आकांक्षेचं आणि स्वाभिमानाचं मूर्त रूप आहेत. आज दलबदलू नेत्यांनी जरांगेंकडे पाहावं आणि स्वतःला आरशात पाहावं.

कारण जेव्हा जनता ठरवते, तेव्हा ती पैशाने विकत घेतलेले लोक नाही, तर हृदयाशी नाळ जोडणाऱ्या नेत्यामागे उभी राहते. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर इतका मोठा लोकसंग्रह कमावणारा एकमेव माणूस म्हणजे मनोज पाटील जरांगे.

ते फक्त नेता नाहीत, ते जनतेच्या श्वासात, रक्तवाहिन्यांत, आणि भविष्यात जगणारे लोकनायक आहेत.

(या लेखामध्ये मांडलेली मते ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

■ ■ ■

गजानन कुसुम ओंकार हरणे
लेखक, साहित्यिक,समाजसेवक,
जिल्हा उपाध्यक्ष,
अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिति .
राज्य उपाध्यक्ष,
अखिल भारतीय मराठा सेवा संघ.
जिल्हा परिषद नगर,
खडकी, अकोला.
9822942623.

## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...


सुनील पांडुरंग खेडेकर, ठाणे यांच्या घरचा बाप्पा


नासिक निवासी सटाणा सोनवणे परिवाराच्या कुटुंबातील सदस्य श्री अशोक सोनवणे यांच्या घरी बाप्पाचे दर्शन घेताना परिवाराचे श्री व सौ हिरामण सोनवणे व परिवार


श्री.मंगेश पिंगुळकर, श्रमिक निवास, चिंचपोकळी (पुर्व)

# आर्थिक स्वार्थावर मात करत भारताची वाढ ७.८ टक्क्यांनी; पंतप्रधान मोदींचा ट्रम्पना अप्रत्यक्ष टोला

**वॉशिंग्टन, दि. २ वृत्तसंस्था**

भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध गेल्या काही दिवसांपासून चांगलेच ताणले गेले आहेत. यादरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी अप्रत्यक्षपणे टीका केली. जग जेव्हा आर्थिक स्वार्थामुळे तयार झालेल्या आव्हानांना सामोरे जात आहे अशा काळात भारताने अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केल्याचे पंतप्रधान म्हणाले. काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादला आहे.

दिल्लीतील सेमिकॉन इंडिया २०२५ मध्ये या वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील जीडीपी आकडेवारीबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, "काही दिवसांपूर्वीच या वर्षीच्या पहिल्या तिमाहीतील जीडीपीची आकडेवारी समोर आली. पुन्हा एकदा भारताने प्रत्येक अंदाज आणि प्रत्येक अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. एकीकडे जगभरातील अर्थव्यवस्था चिंतेत आहेत, आर्थिक स्वार्थातून निर्माण झालेली आव्हाने आहेत, अशा काळात देखील भारताने ७.८ टक्क्यांची वाढ मिळवून दाखवली आहे. ही ग्रोथ सर्व क्षेत्रात आहे. सगळीकडे उत्साह पाहायला मिळत आहे. भारत ज्या वेगाने वाढत आहे, यामुळे सर्वांमध्ये नव्या उर्जेचा संचार होत आहे," असे पंतप्रधान म्हणाले.

अमेरिकेच्या आयात शुल्कात तीव्र वाढीच्या परिणामांची चिंता दूर सारत एप्रिल ते जून या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने अपेक्षेपेक्षा मजबूत वाढीची नोंद केली. काही दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादनांत (जीडीपी) ७.८ टक्के दराने वाढ नोंदविली गेली असून ती आधीच्या पाच तिमाहींतील हा उच्चांक ठरला आहे. रिझर्व्ह बँकेने ऑगस्टच्या सुरुवातीला अंदाजलेल्या ६.५ टक्क्यांपेक्षाही ही वाढ सरस आहे.

# सेंसेक्स 207 अंकांनी घसरला
## महिंद्रा अँड महिंद्रा आणि डॉ. रेड्डीजला सर्वाधिक फटका



**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

मंगळवारी शेअर बाजारात घसरण झाली. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक लाल निशाणीवर बंद झाले. एका बाजूला सेंसेक्स २०७ अंकांनी घसरला, तर दुसऱ्या बाजूला निफ्टी ५० मध्ये ४५ अंकांची घसरण झाली.

मंगळवारी सेंसेक्सने ८०,५२० वर व्यवहाराला सुरुवात केली आणि दिवसाच्या अखेरीस ०.२६ टक्क्यांच्या घसरणीसह ८०,१५७ वर बंद झाला. निफ्टीने मंगळवारी सकाळी २४,५७९ वर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या शेवटी ०.१८ टक्क्यांच्या घसरणीसह २४,५७९ वर बंद झाला. बेंचमार्क निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनी चांगले कामगिरी केली. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.२७ टक्क्यांनी वाढला, तर बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक ०.६४ टक्क्यांनी वधारला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील सुमारे ४४९ लाख कोटी रुपयांवरून वाढून सुमारे ४५० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. याचे श्रेय मिडकॅप आणि स्मॉलकॅप विभागाच्या चांगल्या कामगिरीला जाते.

**सेन्सेक्स 80157**

**निफ्टी 24,579**



निफ्टी ५० मधील टॉप गेनर्समध्ये पावर ग्रिडचा शेअर सर्वात वर राहिला, ज्यामध्ये २.४५ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. त्यानंतर टाटा कंझ्युमरमध्ये २.३४ टक्क्यांची वाढ, नेस्ले इंडियामध्ये २.२६ टक्क्यांची तेजी, एनटीपीसीमध्ये १.७० टक्क्यांची वाढ, टाटा स्टीलमध्ये १.४३ टक्क्यांची तेजी दिसली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा महिंद्रा अँड महिंद्राला झाला, ज्यात २.४५ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर डॉ. रेड्डीजमध्ये २.०५ टक्क्यांची घसरण, कोटक बँकेत १.३३ टक्क्यांची घसरण, आयसीआयसीआय बँकेत १.२० टक्क्यांची घसरण, एशियन पेंट्समध्ये १.१८ टक्क्यांची घसरण झाली.

घसरणीच्या या बाजारात सर्वाधिक तेजी निफ्टी सीपीएसई मध्ये झाली, जो १.२७ टक्क्यांनी वधारला. त्यानंतर निफ्टी पीएसई मध्ये १.१६ टक्क्यांची वाढ, निफ्टी एफएमसीजी मध्ये १.१२ टक्क्यांची वाढ, निफ्टी एनर्जी मध्ये ०.९८ टक्क्यांची वाढ, निफ्टी मीडिया मध्ये ०.९८ टक्क्यांची वाढ झाली.

सर्वाधिक घसरण निफ्टी प्रायव्हेट बँकेत झाली, जो ०.७० टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये ०.६६ टक्क्यांची घसरण, निफ्टी बँकेत ०.६३ टक्क्यांची घसरण, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये ०.४१ टक्क्यांची घसरण, निफ्टी ऑटोमध्ये ०.२९ टक्क्यांची घसरण झाली.

# कर्मचाऱ्याबरोबर प्रेमसंबंध ठेवणे भोवले
## नेस्लेच्या सीईओंची झाली हकालपट्टी

**जिनेवा, दि. २ वृत्तसंस्था**

कनिष्ठ कर्मचाऱ्याशी गुप्तपणे प्रेमसंबंध ठेवल्याबद्दल नेस्लेच्या सीईओंवर कारवाई करण्यात आली आहे. कंपनीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी नेस्लेने सीईओ लॉरेंट फ्रीक्स यांची हकालपट्टी केली आहे. स्विस बहुराष्ट्रीय कंपनीने आता फ्रीक्स यांच्याजागी फिलिप नवरातिल यांची सीईओ म्हणून नियुक्ती केली आहे.

६३ वर्षीय फ्रेंच बिझनेस एक्झिक्युटिव्ह लॉरेंट फ्रीक्स यांची वर्षभरापूर्वी नेस्लेचे सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. १ सप्टेंबर २०२४ रोजी फ्रीक्स यांनी तत्कालीन सीईओ उल्फ मार्क श्नाइडर यांच्याकडून पदभार स्वीकारला होता. मात्र बरोबर एका वर्षानंतर कनिष्ठ कर्मचाऱ्याशी असलेले प्रेमसंबंध ठेवल्याची चौकशी झाल्यानंतर त्यांना काढून टाकण्यात आले आहे.

फ्रीक्स हे नेस्लेमध्ये ४० वर्षांपासून काम करत होते. किराणा दुकानदारांशी करार करून त्यांनी नेस्लेमधील कारकिर्दीची सुरुवात केली होती.

नेस्लेचे अध्यक्ष पॉल बुल्के आणि प्रमुख स्वतंत्र संचालक पाब्लो इस्ला यांच्या नेतृत्वाखालील समितीने चौकशी केल्यानंतर लॉरेंट फ्रीक्स यांची तात्काळ हकालपट्टी करण्यात आली.


कंपनीने एका निवेदनात म्हटले, फ्रीक्स यांचे गुप्त प्रेमसंबंध हे नेस्लेच्या आचारसंहितेचे उल्लंघन आहे. त्यामुळे त्यांना पदापासून दूर करण्यात आले आहे. हा एक महत्त्वाचा निर्णय आहे. नेस्लेची मुल्ये आणि उत्तम प्रशासन हा आमच्या कंपनीचा मजबूत पाया आहे. फ्रीक्स यांच्या सेवेबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.

बीबीसीने दिलेल्या वृत्तानुसार, कंपनीच्या व्हिसलब्लोइंग चॅनेलद्वारे ही गुप्त माहिती बाहेर आली. फ्रीक्स यांनी कनिष्ठ सहकाऱ्याशी प्रेमसंबंध ठेवल्याचे समजल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. मात्र संबंधित कर्मचाऱ्याचे नाव उघड करण्यात आले नाही. तसेच प्रेमसंबंध असलेली व्यक्ती कार्यकारी मंडळाचा सदस्य नाही, असेही सांगण्यात आले.

# ट्रम्पसोबत ट्रेड डीलबाबत चर्चा- पीयूष गोयल

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी मंगळवारी सांगितले की भारत अमेरिकेसोबत द्विपक्षीय व्यापार करार (बीटीए) करण्यासाठी चर्चा करत आहे. येथे एका उद्योग संघटनेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना गोयल म्हणाले, "आत्तापर्यंत बरेच काही झाले आहे आणि अजून बरेच काही होणे बाकी आहे. आम्ही अमेरिकेसोबत बीटीएसाठी चर्चा करत आहोत." भारत आणि अमेरिका मार्चपासून या कराराबाबत चर्चा करत आहेत. आत्तापर्यंत पाच फेऱ्यांची चर्चा पूर्ण झाली आहे. २७ ऑगस्टपासून ५० टक्के शुल्क लागू केल्यानंतर अमेरिकन प्रतिनिधीमंडळाने पुढील फेरीची चर्चा, जी २५ ऑगस्टपासून सुरू होणार होती, ती स्थगित केली. अद्याप सहाव्या फेरीसाठी कोणतीही तारीख निश्चित करण्यात आलेली नाही.



गोयल पुढे म्हणाले की भारताने आधीच ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमीरात, मॉरिशस, ब्रिटन आणि चार युरोपीय देशांच्या गट ईएफटीएसोबत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली आहे. भारत-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे वित्तमंत्री स्कॉट बेसेंट म्हणाले की शेवटी हे दोन्ही महासत्ता देश या समस्येचे समाधान नक्कीच काढतील.

# कमळवेड्या माणसाची कथा

निसर्गात रमणारी माणसं ध्येयवेडी असतात. राष्ट्रीय फुल कमळ हे सर्वानाच मोहून टाकणारे आहे. मात्र,या फुलावर जीवापाड प्रेम करणाऱ्या कमळमॅनची कथा देखील तितकीच अनोखी आहे. या कमळ मॅनचा जन्म लोणावळा येथे झाला. आई वडिलांच्या अकाली निधनानंतर याचे संगोपन आजोळी आजीआजोबांच्या कडेच झालं. शारीरिक व्यंगावर मात करून आपल्या छंदालाच व्यावसायिक स्वरूप देऊन तेच आपल्या उपजीविकेचं साधन बनविणारा हा अवलिया म्हणजेच चिंचवड मध्ये राहणार सतीश गाडिया. याचा छंद कोणता तर कमळ फुलांच्या विविध प्रजातींच्या कमळ बागेचा.

सतीशचे बालपण चिंचवड मध्ये आपल्या आजोळी गेले. त्याची आजी सुंदराबाई बागमार हिला निसर्ग,फुलझाडं आणि बागकामाची खूप आवड होती. देवपूजेसाठी तिला विविध फुल लागायची. त्यासाठी सतीश आपल्या आजीसाठी तासंतास भटकून कमळफुलं आणून द्यायची. पुढे मोठे झाल्यानंतर



सतीशने पोटापाण्यासाठी लौंड्रीचा व्यवसाय सुरु केला खरा, परंतु कमळ फुलांचे वेड काही डोक्यातून जात नव्हते. लौंड्रीच्या कपड्यापेक्षा सतीश फुलांमध्येच जास्त रमत. लौंड्रीचे कपडे गोळा करण्यासाठी एके दिवशी एका ग्राहकाच्या अंगणात असलेल्या कमळफुलाने तयन आकर्षित केले. त्यामुळे कमळप्रेमी असलेल्या सतीशच्या मनातील कमळ फुलांच्या आवडीने पुन्हा उचल खाल्ली. त्या ग्राहकाकडून एक कमळ घेऊन सतीशने आपल्या घरातील एका भांड्यात पाणी टाकून ते लावलं. प्रथमवर्षी त्याला एकही

**मुलखावेगळी माणसं**

कंद आला नाही. परंतु ते निराश झाले नाहीत. परंतु मग कमळ वेड्या सतीशजींनी कमळावर आधारित अनेक पुस्तकांचा अभ्यास केला या दरम्यान अचानक एके दिवशी या कमळाला टपोरी कळी फुलली. मग तर सतीशजींचं कमळप्रेम आणखीच फुल्ल. पाहता पाहता हे रोप छोट्या भान्ड्यातून तबकात,नंतर मग मोठ्या लोखण्डी टबात ते कमळरोप विसावलं. आता सतीशजींची अडचण झाली ती जागेची. त्यांचं घर छोट होत मग त्यांनी आपल्या घराच्या छपरावर आपली कमळबाग फुलवायला सुरवात केली.

दरम्यानच्या काळात आपल्या कमळ छंदाविषयीची सर्व शास्त्रीय माहिती त्यांनी जाणून घेतली आणि त्यानंतर कमळाच्या विविध जातींची जोपासना त्यांनी सुरु केली. त्यांचे हे कमळ वेड पाहून त्यांच्या सासऱ्यांनी त्यांना आळंदी जवळ त्यांना डुडुळ गावात एक एकर जमीन दिली. या जमिनीवर सतीश यांनी १० बाय १० चे हौद निर्माण केले अशा प्रकारे पत्र्यावरची कमळ बाग हि शिवारात पोहचली. तोपर्यंत गोदीयाकडे चार ते पाच प्रकारची कमळफुलं होती. आज त्यांची फुललेली कमळबाग बघायला अनेक हौशी लोक येतात तसेच आयुर्वेदाचा अभ्यास करणारे डॉक्टर देखील येतात त्यांना आयुर्वेदेच्या दृष्टीने कमळाचं महत्व सतीश लोकांना पटवून सांगतात. त्याच बरोबर कमळाच्या पाककृती,कमळाचे औषधी गुणधर्म,कमळाचे धार्मिक महत्व अशा प्रकारची माहिती ते लोकांना देतात.एकूणच,या छंदामुळे सतीश गोदीया यांची कमळ मॅन अशीच जी ओळख मागील काही वर्षात निर्माण झालेली आहे ती अगदी योग्यच आहे.

**लोकमानस**

# 4-मिती धोरणावर लक्ष केंद्रित करून रेमेडियम लाईफकेअर चार्ट्स 4X वाढीचा मार्ग

औषध पुरवठा साखळी आणि विशेष रसायन क्षेत्रातील वेगाने वाढणारी कंपनी, रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडने ४-मिती धोरणावर आधारित एक रणनीतिक रोडमॅप यशस्वीरित्या अनावरण केला आहे.पहिला स्तंभ प्रगत उत्पादन आहे, जो विद्यमान सीडीएमओ(कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑर्गनायझेशन) सुविधांचे अपग्रेडिंग आणि वाढत्या जागतिक मागणीला पूर्ण करण्यासाठी क्षमता वाढविण्यावर केंद्रित आहे. हे एकात्मता उपक्रम खर्चात आणखी ऑप्टिमाइझ करतील आणि उच्च नफा सुनिश्चित करतील.दुसरा स्तंभ म्हणजे जागतिक निर्यात विस्तार, ज्यामध्ये नवीन भौगोलिक क्षेत्रात प्रवेश करून आणि विद्यमान बाजारपेठांमध्ये त्याची उपस्थिती वाढवून आंतरराष्ट्रीय पाऊल ठसा मजबूत करण्याच्या योजना आहेत.वाढलेली पुरवठा साखळी क्षमता आणि कार्यरत भांडवल तैनाती अखंड जागतिक ऑपरेशन्सना समर्थन देईल.

तिसरा स्तंभ म्हणजे नवोन्मेष आणि संशोधन आणि विकास उत्कृष्टता, ज्याला एक समर्पित गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेची स्थापना आणि संसर्गविरोधी, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आणि मध्यवर्ती मज्जासंस्था उपचारांसारख्या उपचारात्मक क्षेत्रांमध्ये व्यापक संशोधनाद्वारे समर्थित केले जाते. हे उत्पादन विकासाला गती देईल, नियामक अनुपालन सुनिश्चित करेल आणि कंपनीच्या नवोन्मेष पाइपलाइनला बळकटी देईल. चौथा स्तंभ म्हणजे उत्पादन विविधीकरण, ज्याचा उद्देश कंपनीच्या विशेष रसायन आणि औषधनिर्माण पोर्टफोलिओचा विस्तार करणे आणि बाजारपेठेच्या बदलत्या गरजा पूर्ण करणे, क्षेत्रीय चढउतारांविरुद्ध लवचिकता सुनिश्चित करणे आणि महसूल प्रवाहांचा विस्तार करणे आहे. रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आदर्श मुंजाल म्हणाले, "ही तिमाही रेमेडियम लाईफकेअर लिमिटेडसाठी एक टर्निंग पॉइंट आहे. आमच्या संपूर्ण आर्थिक वर्ष २०२५ च्या नफ्यापेक्षा जास्त PAT देणे हे आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि ऑपरेशनल चपळता दर्शवते. यशस्वी राईट्स इश्यू आणि आमची केंद्रित ४-बिंदू धोरण-चालवणारी उत्पादन उत्कृष्टता, जागतिक निर्यातीला गती देणे, संशोधन आणि विकास नवोपक्रम वाढवणे आणि उत्पादन विविधीकरणाचा विस्तार करणे आम्हाला ४ पट वाढ साध्य करण्यासाठी आणि आमच्या भागधारकांसाठी शाश्वत मूल्य निर्माण करण्यासाठी एक शक्तिशाली पाया प्रदान करते."

**माझं मत**

# मराठा आरक्षण आंदोलन यशश्वी होईल का?

१] मीनल देशमुख [ सामाजिक कार्यकर्ती ]

मागील चार दिवसापासून मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरंगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे हक्काच्या आरक्षणासाठी आंदोलन सुरु आहे जे मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. अर्थात इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा बांधवाना सरकार आरक्षण देऊ शकते आणि तेही घटनेच्या तरतुदीनुसारच. मराठा समाज हा मूलतः कुणबी आहे आणि कुणबी म्हूनन या समाजाला नक्कीच आरक्षण देऊन हा लढा यशश्वी होऊ शकतो.

२] विद्याधर साळवी [शिक्षक ]

आर्थिक दृष्टिकोनाचे निकष जर मराठा समाजाला लावले तर हा समाज इतर मागास समजाप्रमाणेच आर्थिक दुर्बल आहे म्हणूनच मराठा समाजाला त्यांच्या हककचे आरक्षण सरकारने द्यायलाच हवे. मुंबईतील जरांगे पाटील यांनी सुरु केलेला आंदोलनाचा हा लढा म्हणजे फक्त भावनात्मक नाही तर मराठा समाजाच्या भावी पिढीच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचा लढा आहे. म्हणूनच मनोजदादा प्राणप्रणाणे लढत आहेत आणि महाराष्ट्रातील तमाम मराठ्यांची फौज हा लढा यशश्वी करणारच.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 'आप'च्या आमदाराला बलात्कार प्रकरणी अटक
## फिल्मी स्टाईल गोळीबार करत पोलीस ठाण्यातून फरार

**कर्नाल, दि. २ वृत्तसंस्था**

आम आदमी पक्षाचे आमदार हरमीत सिंग पठाणमाजरा यांना बलात्कार आणि फसवणूक प्रकरणी अटक करण्यात आली होती. मात्र कर्नाल येथील पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्यांनी पोलिसांवरच गोळीबार करत तिथून पळ काढल्याचे वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

पंजाबच्या सनौर विधानसभेचे आमदार असलेल्या हरमीत सिंग यांना स्थानिक पोलीस ठाण्यात नेण्यात आले होते. तिथे त्यांच्या काही सहकाऱ्यांनी गोळीबार केला. यात काही पोलीसही जखमी झाले आहेत. या गोंधळानंतर आमदार हरमीत सिंग यांनी पांढऱ्या एसयुव्हीमधून पळ काढल्याचा आरोप केला जात आहे.



पंजाबमध्ये उद्भवलेल्या पूरपरिस्थितीबाबत आमदार हरमीत सिंग यांनी आम आदमी पक्षाची दिल्लीतील नेतृत्व आणि जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव कृष्ण कुमार यांच्यावर टीका केल्यानंतर हे सर्व घडले आहे.

आमदार हरमीत सिंग पठाणमाजरा यांच्या पूर्व पत्नीने सोमवारी रात्री पटियाला येथील सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. १२ फेब्रुवारी २०१४ ते १२ जून २०२४ या कालखंडात आमदारांनी गुन्हा केल्याचा आरोप करण्यात आला. या तक्रारीनंतर एफआयआर दाखल झाला असून आमदार हरमीत सिंग यांच्यावर बलात्कार, फसवणूक आणि गुन्हेगारी धमकीच्या आरोपाखाली भादंवि कलम ३७६, ४२० आणि ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान पठाणमाजरा यांनी आज सकाळी फेसबुकवर लाईव्ह येत आपल्यावरचे आरोप फेटाळून लावले आहेत. दिल्लीतील आपचे नेतृत्व पंजाबवर बेकायदेशीरपणे राज्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच त्यांनी याविरोधात आवाज उठवल्याबद्दल त्यांच्यावर आकसाने कारवाई होत आहे, असेही ते म्हणाले.

**तेलंगणात मोठा राजकीय भूकंप**

# के. कवितांची पक्षातून हकालपट्टी, वडिलांनीच केली कारवाई

**हैदराबाद, दि. २ वृत्तसंस्था**

तेलंगणामधून मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांची कन्या आणि आमदार के कविता यांना मंगळवारी भारत राष्ट्र समिती पक्षामधून निलंबित करण्यात आले. पक्षाची बदनामी करणाऱ्या कारवायांमुळे के. कविता यांना पक्षातून काढून टाकण्यात आले आहे. पक्षाध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांनी के. कविता यांना तात्काळ पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे.



तेलंगणातील मुख्य विरोधी पक्ष भारत राष्ट्र समितीचे संस्थापक के. चंद्रशेखर राव यांच्या कुटुंबात खूप गोंधळ सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. के. चंद्रशेखर राव यांनी मुलगी कविता यांच्यावर मोठी कारवाई केली. पक्षाविरुद्धच्या वक्तव्यांमुळे आणि कारवायांमुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. काही दिवसांपूर्वीच के. कविता यांनी बीआरएस नेत्यांवर केसीआर यांची प्रतिमा मलिन करण्याचा आरोप केला होता.

त्यानंतर आता के. कविता यांचे सध्याचे वर्तन आणि त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कारवाया पक्षाची प्रतिमा मलिन करत आहेत, त्यामुळे पक्षाध्यक्ष केसीआर यांनी कविताला तात्काळ निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे बीआरएस यांनी म्हटले आहे. महत्त्वाचे म्हणजे २२ ऑगस्ट रोजीही कविता यांच्या परदेश दौऱ्यादरम्यान बीआरएसने त्यांच्यावर कारवाई केली होती. त्यावेळी त्यांना अचानक टीबीजीकेएस म्हणजेच तेलंगणा बोग्गु गनी कर्मिका संगमच्या अध्यक्षपदावरून काढून टाकण्यात आले होते. त्यांनी पक्षाच्या नेत्यांवर त्यांच्याविरुद्ध कट रचल्याचा आरोप केला होता. त्यावेळी पदावरून काढून टाकणे हे राजकीयदृष्ट्या प्रेरित पाऊल होते असं के. कविता यांनी म्हटलं होतं.

# बीजेपीकडून 4 सप्टेंबरला बिहार बंदची हाक

**पटना, दि. २ वृत्तसंस्था**

बिहारमधील एका कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या दिवंगत मातोश्रींविरोधात महाआघाडीकडून केलेल्या अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ एनडीएकडून ४ सप्टेंबरला बिहार बंद करण्यात येणार आहे.

बिहार बंदची घोषणा बिहार भाजपाध्यक्ष दिलीप जायसवाल यांनी केली. त्यांनी सांगितले की, या काळात सर्व आपत्कालीन सेवा सुरू राहतील. बंद सकाळी ७ वाजेपासून दुपारी १ वाजेपर्यंत असेल.

माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार राज्य जीविका निधी साख सहकारी संघ लिमिटेडच्या शुभारंभाचे थेट प्रक्षेपण करताना दिलेल्या भाषणावेळी भाजप प्रदेश कार्यालयात उपस्थित प्रदेशाध्यक्ष डॉ. दिलीप जायसवाल आणि काही महिला नेत्या भावुक होऊन रडू लागल्या होत्या.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'वोटर अधिकार यात्रा' दरम्यान पंतप्रधान मोदींच्या मातोश्रींविषयी करण्यात आलेल्या अपशब्दांबद्दल मंगळवारी मोदींनी मौन सोडले.

मोदी म्हणाले की, "बिहारमध्ये काही दिवसांपूर्वी जे घडलं त्याची मी कल्पनाही केली नव्हती. आरजेडी-काँग्रेसच्या मंचावरून माझ्या आईला शिव्या देण्यात आल्या. या शिव्या फक्त माझ्या आईला नाहीत तर राज्यभरातील आणि देशातील मातांना दिलेल्या आहेत. कारण आई म्हणजे सर्वांचीच आई असते." त्यांनी पुढे सांगितले की, "जितकी वेदना माझ्या मनात आहे तितकीच वेदना बिहारच्या जनतेच्या मनातही असेल."

दरम्यान, भाजप नेते व प्रदेशाध्यक्ष दिलीप जायसवाल यांचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यात ते रडताना दिसत आहेत. खरं तर, बिहार जीविका निधी साख सहकारी संघ लिमिटेडच्या शुभारंभावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संबोधन दिले होते.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219